१९५५ पासून निर्भिड लिखाण करणारे व महिलेने चालविलेले स्वतंत्र दैनिक

# लोकशाही

लोक LIVE
तुमच्या मनातलं...!
www.lokshahilive.com

Download Our Apps | GET IT ON Google play

इंटरनेट आवृत्ती - www.lokshahilive.com, https://www.facebook.com/lokshahilive/



पान 3 / वाघ नगर परिसरात ....

जळगाव, शनिवार, दि.२० जून २०२६ | RNI NO.MAHMAR/2009/33028, REG.NO.JAL/16/2024-26 | • अंक -२१२ •पाने ६ •किंमत ३ रु.

## जळगावच्या सराफा बाजारात सोनं चार हजारांनी स्वस्त!

### खरेदीदारांना दिलासा : चांदीच्या दरात अठरा हजारांची घसरण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

सोने आणि चांदी खरेदी करणाऱ्यांसाठी तसेच गुंतवणूकदारांसाठी एक अत्यंत दिलासादायक आणि मोठी बातमी आहे. आज शुक्रवार दि. १९ जून रोजी देशभरासह जळगावच्या सुप्रसिद्ध सुवर्णनगरीत सोन्या-चांदीच्या दरात मोठी घसरण नोंदवण्यात आली आहे. भारतीय सराफा बाजारासोबतच मल्टी कमोडिटी एक्स्चेंजवरही मौल्यवान धातूंच्या किमती कमालीच्या घसरल्या आहेत. जळगावच्या स्थानिक बाजारात तर सोन्या-चांदीच्या किमतीत थेट हजारो रुपयांचा फरक पडल्याने ग्राहकांची पावले पुन्हा एकदा सराफा बाजाराकडे वळू लागली आहेत.

सुवर्णनगरी जळगावच्या बाजारात आज सोन्या आणि चांदीच्या भावात मोठी घसरण पाहायला मिळाली. जळगावच्या बाजारात काल सोन्याचे दर १ लाख ४८ हजार ५०० रुपये प्रति १० ग्रॅम होते. त्यात आज एकाच दिवसात तब्बल ४ हजार रुपयांची मोठी घसरण होऊन ते १ लाख ४४ हजार ५०० रुपयांवर खाली आले आहेत. चांदीच्या किमतीत तर आज मोठा भूकंप झाला आहे. काल २ लाख ५० हजार रुपये प्रति किलो ग्रॅम असलेला चांदीचा दर आज तब्बल १८ हजार रुपयांनी घसरला असून तो २ लाख



३८ हजार रुपयांवर खाली आला आहे.

मल्टी कमोडिटी एक्स्चेंजवर देखील आज सकाळपासूनच कमालीची घसरण पाहायला मिळाली. एमसीएक्सवर सोने तब्बल १ हजार ५९३ रुपयांनी प्रति १० ग्रॅम स्वस्त झाले आहे, तर चांदीच्या दरात ६ हजार ५७ रुपयांची घसरण नोंदवली गेली. सिल्व्हर एक्स्चेंज ट्रेडेड फंड्समध्ये जवळपास ५ टक्क्यांपर्यंत विक्रीचा दबाव दिसून आला. एमसीएक्सवर चांदीचा भाव घसरून सुमारे २ लाख ३७ हजार ६२० रुपये प्रति किलोपर्यंत आला आहे. देशातील विविध शहरांमध्ये चांदीचा दर २ लाख ३८ हजार ७०० रुपये ते २ लाख ५९ हजार ९०० रुपये प्रति किलोच्या दरम्यान स्थिर आहे.

सोन्याबरोबरच चांदीच्या दरातही मोठी घसरण झाली आहे. सिल्व्हर एक्स्चेंज ट्रेडेड फंड्समध्ये जवळपास ५ टक्क्यांपर्यंत विक्रीचा दबाव दिसून आला आहे. एमसीएक्सवर चांदीचा भाव घसरून सुमारे २ लाख ३७ हजार ६२० रुपये प्रति किलोपर्यंत आला आहे. देशातील विविध शहरांमध्ये चांदीचा दर २ लाख ३८ हजार ७०० रुपये ते २ लाख ५९ हजार ९०० रुपये प्रति किलो दरम्यान आहे.

भारतीय बाजारपेठेत गेल्या काही दिवसांत सोन्या-चांदीने विक्रमी पातळी गाठली होती. आता लग्नाचा हंगाम काहीसा संपल्यामुळे प्रत्यक्ष खरेदीत घट झाली आहे. त्यामुळे गुंतवणूकदार आता उच्च पातळीवर नफावसुली करत आहेत. तसेच, अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हने भविष्यात व्याजदर वाढवण्याचे संकेत दिले आहेत. जेव्हा व्याजदर वाढतात, तेव्हा गुंतवणूकदार सोन्यामधील गुंतवणूक काढून ती सरकारी रोख्यांमध्ये लावतात. यामुळे सोन्याची मागणी घटते आणि किमती कमी होतात.

## अमराठी चालकांवर १५ ऑगस्टनंतर कारवाई

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

राज्यातील अमराठी रिक्षा व टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे आणि प्रवाशांशी संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी परिवहन विभागाने धोरणात्मक आणि ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सीचालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. १५ ऑगस्टनंतर प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर



कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली राबवण्यात येणाऱ्या या उपक्रमासाठी सरकारने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद आणि मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत तज्ज्ञ संस्था म्हणून नियुक्ती केली आहे. या संस्थांमार्फतच चालकांना मोफत मराठी भाषा प्रशिक्षण दिले जाणार असून, त्यांच्याकडून देण्यात येणारे प्रमाणपत्रच परिवहन विभागाकडून ग्राह्य धरले जाणार आहे. परिवहन विभागाचे सहआयुक्त रवी गायकवाड यांनी दिलेल्या माहितीनुसार, मुंबई महानगर प्रदेश क्षेत्रात (एमएमआर) प्रशिक्षण वर्ग मोठ्या प्रमाणावर सुरू असून यासाठी सुमारे ७१ अभ्यास केंद्रे कार्यान्वित करण्यात आली आहेत. या मोहिमेला शैक्षणिक बळ देण्यासाठी कोकण मराठी साहित्य परिषदेचे सुमारे साडेचार

पान २ वर »

## पुढील दोन दिवसात १९ राज्यांत वादळी इशारा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** वृत्तसंस्था

महाराष्ट्रात मान्सून रखडला आहे. तर देशातील काही राज्यांत प्रचंड उकाडा जाणवत असताना, मान्सूनची बिहार-झारखंडसह अनेक राज्यांत प्रगती दिसून येत आहे. त्याचवेळी हवामान विभागानं दिलासादायक अंदाज वर्तवला आहे. कोकण-गोव्यासह १९ राज्यांमध्ये वादळी वाऱ्यांसह पावसाची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. काही ठिकाणी तर वादळी वाऱ्यांसह विजांचा कडकडाटही असेल. या काळात ५० ते ७० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहण्याचीही शक्यता आहे. पश्चिम बंगाल म्हणजेच उप-हिमालयाचा भाग दार्जिलिंगपासून कूच बिहारपर्यंत, तसेच सिक्कीममधील नागरिकांना सतर्क राहावं लागणार आहे. हवामान विभागानं या भागात पुढील ८ ते ४८ तासांत मुसळधार पाऊस कोसळेल, अशी शक्यता व्यक्त केली आहे. हवामान विभागाच्या अंदाजानुसार, २३ जूनपर्यंत मान्सून महाराष्ट्र, तेलंगणा, ओडिशा, झारखंड, बिहार



आणि छत्तीसगडमधील काही भागांत पुढे सरकण्याची शक्यता आहे. तर ईशान्येकडील अनेक राज्यांत पुढील आठवड्यापर्यंत मुसळधार पावस कोसळण्याचा अंदाज आहे. त्यामुळे बंगालचा उपसागर आणि अरबी समुद्रातील काही भागात २० ते २४ जून या कालावधीत खोल समुद्रात न जाण्याचा सल्लाही दिला आहे. कोकणसह गोवा, पश्चिम बंगाल, सिक्कीम, आसाम, मेघालय, अरुणाचल प्रदेश, ओडिशा, बिहार, झारखंड, केरळ आणि कर्नाटकातील काही भागांत पुढील काही दिवसांत दमदार पाऊस कोसळण्याची शक्यता हवामान विभागाने व्यक्त केली आहे. तर राजस्थान, मध्य प्रदेश, झारखंड, ओडिशा, बिहार, तेलंगणा आणि दक्षिण भारतातील काही भागांत ५० ते ८० किलोमीटर प्रतितास

पान २ वर »

## शिवसेना बंडखोरांचे समर्थक-विरोधक आमने-सामने

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

शिवसेने उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे मशाल चिन्हावरुन निवडून आलेल्या ९ खासदारांपैकी ६ खासदारांना फोडण्याचा विडा एकनाथ शिंदे यांनी दिल्ली दरबारी उचलल्याने आणि त्यास शिवसेनेच्या हिरकमहोत्सवी वर्धापन दिनाचा मुहूर्त निवडल्याने राज्यभरात



निदर्शने सुरु आहेत. परभणी, अहिल्यानगरात बंडखोर खासदारांच्या प्रतिमांना जोडे मारणे आणि कुठे गाढवांवरुन या प्रतिमांची मिरवणूक काढणे असे प्रकार घडले. तर शिवसेना एकनाथ शिंदे गटाच्या नेत्यांनी या खासदारांच्या प्रतिमांना नंतर दुग्धाभिषेक करुन त्यांची मिरवणूक काढली. परभणीच्या सोनपेठमध्ये ठाकरे शिवसेना कार्यकर्ते आणि खासदार बंडु जाधव यांचे समर्थक आमने -सामने आले होते. उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी खासदार बंडू जाधव यांची अंत्ययात्रा काढल्यामुळे चिडलेल्या खासदार संजय जाधव यांच्या समर्थकांनी त्याच ठिकाणी जाधव यांच्या प्रतिमेला दुग्ध अभिषेक केला. खासदार जाधव यांची गाडी फोडण्याची भाषा कारण्यांनी आधी आमच्याशी खेटावे असे खासदार

पान २ वर »

## रील स्टार रोहिणी आत्महत्येप्रकरणी पतीच्या विरोधात गुन्हा दाखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोलापूर** प्रतिनिधी

सोलापूर जिल्ह्यातील मंगळवेढा येथील प्रसिद्ध रील स्टार रोहिणी पाराध्ये हिच्या आत्महत्येने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडाली होती. रोहिणीने एवढे टोकाचे पाऊल का उचलले? याचा तपास पोलिसांकडून सुरू असतानाच आता या प्रकरणात एक मोठा ट्विस्ट आला आहे. रोहिणीच्या वडिलांनी दिलेल्या तक्रारीवरून तिचा पती निलेश पाराध्ये याच्याविरोधात मंगळवेढा



पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पतीच्या सततच्या शारीरिक आणि मानसिक त्रासाला कंटाळूनच रोहिणीने मृत्यूला कवटाळल्याचे

पान २ वर »

## यावल तालुक्यातील दत्त डेअरीत अन्न सुरक्षा विभागाची कारवाई

### दूध, दही, पनीर, तूप व क्रीमचे नमुने तपासणीसाठी सीलबंद

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**यावल** प्रतिनिधी

तालुक्यातील ऐतिहासिक फैजपूर शहरातील हनुमान मंदिर परिसरातील दत्त डेअरीत अन्न सुरक्षा व औषध प्रशासन विभागाच्या पथकाने आज शुक्रवार दि. १९ रोजी सकाळी आठ वाजेच्या सुमारास अचानक तपासणी मोहीम राबविली व डेअरीत दुधापासून तयार केलेल्या विविध वस्तूंचे नमुने पुढील कार्यवाहीसाठी सिलबंद करून ताब्यात घेतले. यामुळे फैजपूर शहरात दुग्धजन्य पदार्थ वापरणाऱ्या सुज्ञ व आर्थिक संपन्न व सर्व सामान्य ग्राहकांमध्ये आरोग्याच्या दृष्टिकोनातून मोठी खळबळ उडाली. अन्न सुरक्षा व औषध प्रशासनाकडे प्राप्त झालेल्या तक्रारींच्या अनुषंगाने ही कारवाई करण्यात आली असून पथकाने तब्बल पाच तास डेअरीची तपासणी केली. दत्त डेअरीतील तपासणीदरम्यान दूध, दही, पनीर, तूप व क्रीम यांचे नमुने घेऊन ते सीलबंद करण्यात आले. संबंधित नमुने शासकीय प्रयोगशाळांमध्ये तपासणीसाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती अधिकृत सूत्रांनी दिली. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच उत्पादनांमध्ये भेसळ आहे किंवा नाही याबाबत स्पष्टता होणार आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, तपासणी अहवालात भेसळ आढळल्यास संबंधितांवर अन्न सुरक्षा कायद्यानुसार फौजदारी कारवाई करण्यात येऊ शकते. तसेच आवश्यकतेनुसार परवाना रद्द करण्याबाबतही शिफारस केली जाऊ शकते. तपासणी दरम्यान डेअरीतील स्वच्छता, दूध साठवणूक पद्धती तसेच विक्रीसाठी ठेवण्यात आलेल्या पदार्थांची पाहणी करण्यात आली. दूध व दुग्धजन्य पदार्थांच्या गुणवत्तेबाबत निश्चित निकषांचे पालन होत आहे की नाही, याचीही खात्री करण्यात आली. अन्न सुरक्षा विभाग राज्यभर भेसळविरोधी मोहिम राबवत

पान २ वर »

## पाकिस्तानची भारताला पोकळ धमकी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नवी दिल्ली** वृत्तसंस्था

सिंधु जल करारावरुन भारतासमोर दयेची भिक मागणारा पाकिस्तान पुन्हा एकदा गरळ ओकू लागला आहे. संयुक्त राष्ट्रात आणि इतर आंतरराष्ट्रीय व्यासपीठांवर प्रश्न मांडणाऱ्या पाकिस्तानची मागणी फेटाळत भारताने जगासमोर संदेश दिला आहे की रक्त आणि पाणी एकसाथ वाहू शकत नाही असे म्हटले आहे. जर पाकिस्तानला सिंधुनदीचे पाणी हवे तर सीमेपलिकडून दहशतवादाला प्रोत्साहन देणे बंद करावे असे भारताने सुनावले आहे.आता पाकिस्तानचे सगळे रडीचे डाव संपल्याने आता पाकिस्तान पुन्हा आपल्या शिळ्या कढीला उतू देत आहे. आता पुन्हा पाकिस्तानने भारताला धमकी दिली आहे की भारताने पाणी रोखण्याचा प्रयत्न केला तर इस्लामाबाद याला योग्य उत्तर देण्यासाठी तयार आहे. पहलगाम अतिरेकी हल्ल्यानंतर भारताने सिंधु जल करार रद्द केला होता. सुमारे १४ महिन्यांनंतर आता पाकिस्तानने धमकी देण्यावर उतरला आहे. शाहबाज शरीफ यांच्या सरकारमध्ये सामील पाकिस्तान पिपल्स पार्टीचे चेअरमन बिलावल भुट्टो झरदारी यांनी म्हटले आहे की इस्लामाबाद यास सहन करणार नाही. पाकिस्तानच्या नॅशनल असेंबलीत भाषण करताना

पान २ वर »

## ते फोटो मार्फ केलेले मुंबईत तक्रार दाखल करणार!

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**बुलढाणा** प्रतिनिधी

भाजप नेते आणि मंत्री गिरीश महाजन यांचा एका तरुणीसोबतचा फोटो सोशल मीडियावर चांगलाच व्हायरल झाला आहे. या फोटोमुळे मोठी खलबळ उडाली असून, विरोधकांकडून गरीश महाजन यांच्या कोंडीचा प्रयत्न सुरू आहे. दरम्यान यावर आता मंत्री गिरीश महाजन यांची पहिली



प्रतिक्रिया समोर आली आहे. ते बुलढाण्यात बोलत होते. सदर फोटो मार्फ केलेला आहे, यासंदर्भात मी उद्या मुंबई तक्रार देखील दाखल करणार आहे. मला माहित नाही हे फोटो कसे

पान २ वर »

## 'ड्रॉप केस'च्या साम्राज्यावर सर्जिकल स्ट्राइक!

### मुक्ताईनगरातील पाच गावांवर पहाटे ऑपरेशन : रोकड, दागिने, गावठी कट्टे जप्त

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

'ड्रॉप केस'साठी कुप्रसिद्ध असलेल्या मुक्ताईनगर तालुक्यातील लालगोटा, हलखेडा, मधापुरी, जोंधनखेडा आणि चारठाणा या गावांवर जळगाव पोलिसांनी शुक्रवारी पहाटे अभूतपूर्व धाडसत्र राबवत 'ऑपरेशन ड्रॉप केस' हे विशेष अभियान यशस्वी केले. जिल्हा पोलीस



**मोठा मुद्देमाल जप्त**

या कारवाईत एकूण २० लाख रुपयांची रोकड, अंदाजे ३० लाख रुपयांचे ३०० ग्रॅम सोन्याचे दागिने, ८ लाख रुपयांचे ४ किलो चांदीचे दागिने, दोन गावठी कट्टे, तीन जिवंत काडतुसे, हरणाचे, कोल्ह्याचे व सशाचे कातडे, चार चारचाकी वाहने, सहा दुचाकी वाहने आणि ३० मोबाईल फोन जप्त करण्यात आले. याशिवाय संशयास्पद स्वरूपाचा इतर मुद्देमालही पोलिसांनी ताब्यात घेतला आहे.

दलाच्या इतिहासातील सर्वात मोठ्या आणि नियोजनबद्ध मोहिमांपैकी एक मानल्या जाणाऱ्या या कारवाईत शेकडो पोलिसांनी एकाचवेळी गावांमध्ये प्रवेश करून संशयित व सराईत गुन्हेगारांवर कारवाई केली.

पान २ वर »

### सोने-चांदी

- **सोने** (प्रति १० ग्रॅम) : १,४६,६००
- **चांदी** (प्रति १ किलो): २,३८,०००

### तापमान

- **कमाल** : ३९ अंश सेल्सिअस
- **किमान** : २५ अंश सेल्सिअस

### अग्निहोत्र समय

| दि.२० | दि.२१ |
|---|---|
| सूर्योदय : ५.५१ वा. | सूर्योदय : ५.५१ वा. |
| सूर्यास्त : ७.०८ वा. | सूर्यास्त : ७.०८ वा. |

### महत्वाचे »»

#### जॉर्जिया मेलोनी ट्रम्पवर संतापल्या

**नवी दिल्ली –** आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर सहजपणे वावरत असल्यानं नेहमीच चर्चेच्या केंद्रस्थानी असलेल्या इटलीच्या पंतप्रधान जॉर्जिया मेलोनी आणि अवघ्या जगाचा बॉस मीच आहे या अविर्भावात वावरणारे अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्यात जोरदार खटके उडाले. माझ्यासोबत फोटो काढण्यासाठी भीक मागत होत्या, अशा शब्दांत खिल्ली उडवणाऱ्या डोनाल्ड ट्रम्प यांचे मेलोनी यांनी चांगलेच कान पिरगळले आहेत. इटली आणि मी कधीच कुणासमोर लाचार होत नाही आणि भीकही मागत नाही हे ट्रम्प यांनी लक्षात ठेवावे, असे मेलोनी यांनी ठणकावून सांगितले. अमेरिकी अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी इटलीच्या पंतप्रधान मेलोनी यांची खिल्ली उडवली होती. मेलोनी या माझ्यासोबत फोटो काढण्यासाठी भीक मागत होत्या. माझ्यासोबत फोटो काढण्यासाठी त्या प्रचंड उत्सुक होत्या. मी तर असं काही करत नाही, पण मला त्यांची कीव आली, असे डोनाल्ड ट्रम्प म्हणाले होते. ट्रम्प यांच्या या वक्तव्यावर मेलोनी यांनी बेधडक आणि सडेतोड उत्तर दिले आहे. काही गोष्टी अशा असतात की त्यावर तात्काळ उत्तर देणे गरजेचे असते. डोनाल्ड ट्रम्प यांचं वक्तव्य काल्पनिक आहे. खरे तर हे ऐकून मी हैराण आणि त्रस्त झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आपल्या सहकाऱ्यांसोबत असे वर्तन का करतात हे समजत नाही.

#### जयश्री नागे आत्महत्या नवऱ्याला तुरुंगवास

**अकोला –** अकोल्यात निवडणुकीसाठी ५ लाख आणण्याच्या तगाद्यामुळे एका नवविवाहितेने आत्महत्या केल्याचं प्रकरण. जयश्री नागे असे मृत विवाहितेचे नाव होत. तर आशीष नागे असं आत्महत्याच कारणीभूत ठरलेल्या पतीचे नाव. अखेर अकोला जिल्हा न्यायालयाने जयश्रीच्या आत्महत्या प्रकरणी आरोपी पती आशिष नागेला ७ वर्षाची शिक्षा सुनावली. तर सासरचे अन्य ४ जणांना पुराव्या अभावी कोर्टाने केले निर्दोष मुक्त झाले. पंचायत समिती निवडणुकीसाठी ५ लाख माहेरहून आणण्याचा तगादा लावून विवाहितेचा मानसिक आणि शारीरिक छळ केला होता. सासरच्या या छळाला कंटाळून विवाहिता जयश्री हिने माहेरी केली आत्महत्या होती. कोर्टात अप.क. २१९/२०२२ कलम ४९८ (अ), ३०४ (ब), ३०६, ५०४, ३४ गुन्ह्यांमध्ये आरोपी विरूद्ध महत्वपूर्ण निकाल दिला.

जळगांव 0257 - 2237491, 9422775011, 8999256713 | ठाणे -मुंबई - 9422284511 | नाशिक-9890525925 | पुणे - 9209832828 | lokshahilive@gmail.com, lokshahi@hotmail.com

**पान १ वरून**

## अमराठी रिक्षा-टॅक्सीचालकांवर..

हजार शिक्षक प्रशिक्षण कार्यात सहभागी झाले आहेत. तसेच सर्व प्रादेशिक परिवहन कार्यालयांचे (आरटीओ) अधिकारी चालकांना आवश्यक सहकार्य करत आहेत. प्रवाशांशी संवाद साधताना भाषेची अडचण दूर करणे, सेवा अधिक दर्जेदार बनविणे आणि चालकांच्या व्यावसायिक संधी वाढविणे हा या अभ्यासक्रमाचा मुख्य उद्देश असल्याचे विभागाकडून सांगितले. मराठी भाषेचे प्राथमिक ज्ञान मिळाल्याने प्रवासी व चालक यांच्यातील संवाद अधिक प्रभावी होणार असून दैनंदिन व्यवहार सुलभ होण्यास मदत मिळणार आहे. परिवहन विभागाच्या माहितीनुसार, १५ ऑगस्टनंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या अमराठी चालकांवर नियमानुसार दंडात्मक आणि कायदेशीर कारवाई केली जाईल. मात्र कोणावरही कारवाई करण्याचा उद्देश नसून, सर्व चालकांनी या मोफत प्रशिक्षणाचा लाभ घेऊन वेळेत प्रमाणपत्र मिळवावे, असे आवाहन सहआयुक्त रवी गायकवाड यांनी केले.

## पुढील दोन दिवसात १९ राज्यांत...

वेगाने वादळी वारे वाहण्याची शक्यता आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, २० ते २२ जून या काळात दिल्लीत वादळी वाऱ्यांसह हलक्या स्वरुपाचा पाऊस पडेल. उद्या २० जून रोजी वादळी वाऱ्यांसह हलक्या स्वरुपाच्या पावसाचा अंदाज आहे. तर ६० किलोमीटर प्रतितास वेगाने वारे वाहतील. दिल्लीत २१ जूनपर्यंत अंशतः ढगाळ वातावरण राहील. २२ जूनला देखील हीच परिस्थिती असेल. वादळी वारे किंवा पाऊस होण्याची शक्यता कमी आहे. एकीकडे पुढील ८ ते ४८ तासांत १९ राज्यांमधील काही भागांत पावसाचा अलर्ट दिला असला तरी, बिहारमधील काही भागांत १९ ते २२ जून या दरम्यान उष्णतेच्या लाटेची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. उत्तर प्रदेशातील उत्तरेकडील जिल्ह्यांत १९ ते २४ जून या काळात उष्णतेची लाट असण्याची शक्यता आहे. कोकण आणि गोवा, मध्य महाराष्ट्र आणि विदर्भातही प्रचंड उष्णता जाणवेल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

## शिवसेना बंडखोरांचे समर्थक...

संजय जाधव यांच्या समर्थकांनी प्रतिउत्तर दिले आहे. अहिल्यानगरात फुटीर खासदारांच्या विरोधात ठाकरे शिवसेनेने आंदोलन केले आहे. बंडखोर खासदारांच्या प्रतिमेला जोडे मारत निषेध आंदोलन करण्यात आले. यावेळी ठाकरे शिवसेनेसोबत राष्ट्रवादी शरद पवार गट आणि आरपीआय (गवई गट) देखील आंदोलनात सहभागी झाल्याचे चित्र होते. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी करीत बंडखोर खासदारांच्या प्रतिमा पायदळी तुडवल्या. परभणीचे खासदार संजय जाधव उद्धव ठाकरे यांना सोड चिठ्ठी देणार असल्याच्या मुद्यावरून ठाकरे शिवसेनेचे कार्यकर्ते आक्रमक झाले आहेत. संजय जाधव यांची गाडी फोडू आणि त्यांना फिरू देणार नसल्याचे आव्हान दिले जात आहेत. यावर खासदार संजय जाधव यांच्या समर्थनात शिंदे सेना आता मैदानात उतरल्याने ठाकरे सेना आणि शिंदे सेना आमने -सामने आल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. शिंदे सेनेचे परभणीचे लोकसभा प्रमुख राजू कापसे यांनी तोडफोड करणारे आमच्याकडेच आहेत असे म्हणत ठाकरे सेनेला डिवलचले आहे. ठाकरे शिवसेनेच्या खासदारांनी केलेल्या बंडानंतर अहिल्यानगरमध्ये कार्यकर्त्यांमध्ये संताप पाहायला मिळात आहे. ठाकरे शिवसेनेसह, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्ष, रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया गवई गटाच्या वतीने फुटीर खासदारांच्या प्रतिमांची गाढवावरुन मिरवणूक काढत त्यांच्या प्रतिमांना जोडे मारत आंदोलन केले आले. खरंतर बाळासाहेब ठाकरे, उद्धव ठाकरे यांच्या जीवावर एकेकाळी रिक्षावाला असणाऱ्या एकनाथ शिंदे यांनी सर्व काही मिळवले आहे. ज्या ताटात जेवले तिथेच घाण केली आहे. अशा शब्दात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे शहर प्रमुख किरण काळे यांनी टीका केली आहे. फुटलेल्या खासदारांनी राजीनामे द्यावेत आणि मग शेण खावे असेही किरण काळे यांनी म्हटले आहे.

## पाकिस्तानची भारताला...

बिलावल भुट्टो यांनी भारतावर पाणी रोखण्याचा आरोप केला. ते म्हणाले की, 'आम्ही नद्यांच्या पाण्यातील आमच्या हक्कांचा वाटा सोडणार नाही. पाकिस्तान आपल्या वाट्याचे पाणी आणि अधिकारासाठी लढेल. पाण्याचा प्रवाह रोखण्याच्या कोणत्याही प्रयत्नाला मजबूतीने प्रत्युत्तर दिले जाईल.' पाकिस्तानचे माजी परराष्ट्र मंत्री बिलावल भुट्टो यांनी सिंधु करारावर पहिल्यांदाच वक्तव्य केलेले नाही. याआधी देखील भुट्टो यांनी सिंधु नदीत रक्ताचे पाट वाहतील अशी आगलाऊ भाषा केली होती. गेल्या वर्षी एप्रिल महिन्यात काश्मीरच्या पहलगाम येथे अतिरेकी हल्ला झाल्यानंतर भारताने अनेक प्रकारची पावले उचलली होती. यात सिंधु जल करार रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला होता. साल १९६० मध्ये भारत आणि पाकिस्तानात वाहणाऱ्या नद्यांच्या पाण्याची वाटणी या करारानुसार करण्यात आली होती. भारताने हा करार रद्द केल्याने पाकिस्तानात पाणी संकट येण्याचा धोका निर्माण झाला होता. यामुळे इस्लामाबाद संतप्त झाला आहे आणि या युद्धाची सुरुवात असे म्हणत आहे. पाकिस्तान वारंवार सीमेपलिकडून अतिरेक्यांना रसद पुरवत असून भारतात अशांतता पसरवत आहे. अतिरेक्यांना प्रशिक्षण देण्यापासून ते फंडींग करण्याचा पाकिस्तानचा प्रयत्न जोपर्यंत बंद होणार नाही तोपर्यंत सिंधुनदी पाणी वाटप करार पुन्हा बहाल केला जाणार नाही असे भारताच्या फर्स्ट सेक्रेटरी अनुपमा सिंह यांनी युएनएससी च्या ६२ व्या सत्रात बोलताना स्पष्ट केले आहे. सिंधु जल करारावरुन दिल्ली आपली भूमिका बदलणार नाही असेही भारताने स्पष्ट केले आहे.

## यावल तालुक्यातील...

असून नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये कोणतीही तडजोड केली जाणार नसल्याचे विभागाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. दूध व दुग्धजन्य पदार्थांमध्ये भेसळ असल्याच्या संशयावरून ही कारवाई करण्यात आली आहे. यावल तालुक्यात अनेक ठिकाणी देवी देवतांचे नावे देऊन दुग्धजन्य व इतर खाद्यपदार्थ विक्रीचे गोरख धंदे सर्रासपणे सुरू आहे. काही दूध संकलन करणाऱ्या व्यवसायिकांनी तर गावागावात प्रसिद्धी करून आपले उद्योग धंदे शहरात ठीक ठिकाणी सर्रासपणे सुरू करून अनेक दुग्धजन्य पदार्थ विक्री करीत आहे. ठिकठिकाणी असलेल्या दुग्धजन्य पदार्थ विक्रेत्यांकडे मोठ्या प्रमाणात दूध संकलन नेमके कुठून आणि कोणत्या माध्यमातून केले जाते याबाबतची चौकशी झाल्यास भेसळीचे उद्योग समोर आल्याशिवाय राहणार नाही अशी सर्व स्तरातील नागरिकांमध्ये चर्चा आहे. तालुक्यात अनेक ठिकाणी बिना परवाना थंड पेय पॅकिंग करून अवैधरित्या ठिकठिकाणी विक्री होत आहे. बनावट आरोग्यास हानिकारक विषारी पन्नीची दारू आणि तालुक्यात ताडीचे एक वृक्ष सुद्धा नसताना ताडीच्या नावाखाली बनावट ताडीची दारू विक्री अनेक ठिकाणी सुरू आहे. गेल्या ३ दिवसापूर्वी ताडी विक्री करणाऱ्या विरुद्ध उत्पादन शुल्क विभागाच्या अधिकाऱ्यांनी कारवाई केली परंतु दुसऱ्या दिवशी ते दुकान पूर्ववत सुरू झाले याला काय म्हणावे. ? याबाबत दारूबंदी विभागाचे आयुक्त मुंडे साहेबांकडे लेखी तक्रार केली जाणार असल्याची चर्चा तालुक्यात आहे.

## ते फोटो मार्फ केलेले...

मार्फ केले, पण याबाबत निश्चितच मी तक्रार करतोय असं गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. दरम्यान शिवसेना ठाकरे गटात मोठी फूट पडली आहे. यावर प्रतिक्रिया देताना शिवसेना ठाकरे गटाचे खासदार फुटले कसे असा प्रश्न महाजन यांनी उपस्थित केला होता. गिरीश महाजन यांच्या या वक्त्याचा शिवसेना ठाकरे गटाचे नेते आणि खासदार संजय राऊत यांची चांगलाच समाचार घेतला होता, त्यांनी पत्रकार परिषदेमधून गिरीश महाजन यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला. माझ्याकडे फक्त एक दिवसासाठी ईडी, सीबीआय द्या मी गिरीश महाजन यांना फोडून दाखवतो असं राऊत यांनी म्हटलं होतं. दरम्यान यावेळी बोलताना त्यांनी संजय राऊत यांच्या या टीकेला देखील प्रत्युत्तर दिलं आहे. त्यांना काहीपण बोलण्याचा अधिकार आहे. ते नेहमीच बोलतात त्यामुळे त्यांच्या बोलण्याकडे मी फारस लक्ष देत नाही, असं यावेळी गिरीश महाजन यांनी म्हटलं आहे. दरम्यान दुसरीकडे महाजन यांचा फोटो व्हायरल झाल्यामुळे विरोधकांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली आहे. या व्हायरल फोटो प्रकरणात ते आता लवकरच तक्रार दाखल करणार आहेत. दरम्यान दुसरीकडे आज शिवसेनेचा वर्धापन दिन आहे. शिवसेना ठाकरे गटात मोठी बंडखोरी झाली आहे. या सर्व पार्श्वभूमीवर आज शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे काय बोलणार? कोणावर हल्लाबोल करणार शिवसेना शिंदे गट की भाजप? याबाबत आता उत्सुकता निर्माण झाली आहे. शिवसेना ठाकरे गटातून ६ खासदारांनी बंडखोरी केली आहे.

## ड्रॉप केसच्या साम्राज्यावर...

मुक्ताईनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीतील ही गावे अनेक वर्षांपासून फसवणूक, दरोडे आणि लुटमारीच्या गुन्ह्यांसाठी चर्चेत आहेत. अल्प लोकसंख्या असूनही सोशल मीडियावर काळी हळद, नागमणी, रेड मर्क्युरी, सफेद बिबा, उलटी वासन, सुलेमानी पत्थर, सेकंड करन्सी, ॲल्युमिनियम भंगार, जुने सोने, कॉपर, शंख व डबल इंजिन या सारख्या कथित दुर्मिळ वस्तूंचे व्हिडिओ व्हायरल करून मोठ्या नफ्याचे आमिष दाखवले जात असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या व्हिडिओंना भुलून गावात येणाऱ्या नागरिकांना बनावट वस्तू दाखवून लाखो रुपयांची फसवणूक केली जाते. अनेकांना थेट लुटले जाते तर विरोध करणाऱ्यांना मारहाण केली जाते. काही प्रकरणांमध्ये पीडितांच्या जवळ हरणाचे किंवा वाघाचे बनावट कातडे ठेवून त्यांचे व्हिडिओ तयार केले जातात आणि वन्यजीव तस्करीच्या गुन्ह्यात अडकवण्याची धमकी देत तक्रार करण्यापासून परावृत्त केले जाते. या संपूर्ण प्रकाराला पोलिसांच्या भाषेत 'ड्रॉप केस' म्हटले जाते.

मागील तीन वर्षांत या परिसरात १० दरोडे, १ खुनासह दरोडा, १ खून, ७ जबरी चोरी, १६ फसवणुकीचे गुन्हे, १ दरोड्याचा प्रयत्न आणि २ सरकारी नोकरांवरील हल्ल्यांचे गुन्हे दाखल झाले आहेत. त्यामुळे या भागाकडे पोलिसांचे विशेष लक्ष होते. या कारवाईदरम्यान फरेज राजू पवार, रामजाने राईसाहेब भोसले, आक्काबाई जोगिंदर भोसले, रोहित सुदेश पवार यांच्यासह विविध आरोपींविरुद्ध शस्त्र अधिनियम, महाराष्ट्र पोलीस अधिनियम, भारतीय न्याय संहिता तसेच वन्यजीव संरक्षण अधिनियमांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले. तसेच विलास नरविलाल पवार व अजय दादा पवार या पाहिजे आरोपींनाही अटक करण्यात आली.

**२०० पोलिसांचा सहभाग**

पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आलेल्या या कॉम्बिंग ऑपरेशनमध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी तथा मुक्ताईनगरचे प्रभारी केदार बारबोले, परिविक्षाधीन उपविभागीय पोलीस अधिकारी प्रशांत दरेकर, पोलीस निरीक्षक राहुल गायकवाड, महेश गायकवाड, निलेश गायकवाड, राहुल वाघ, आशिष लव्हांगळे, सहाय्यक पोलीस निरीक्षक विशाल पाटील, योगिता नारखेडे, मीरा देशमुख, अमितकुमार बागुल यांच्यासह सुमारे २०० पोलीस अधिकारी व अंमलदार सहभागी झाले होते.

## रील स्टार रोहिणी...

आता समोर आले आहे. याप्रकरणी पोलिसांनी पती निलेश विलास पाराध्ये याच्याविरुद्ध गंभीर कलमांखाली गुन्हा दाखल केला आहे. गेल्या २६ मे रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास, ब्रह्मपुरी हद्दीतील ग्रामपंचायत हॉटेलमध्ये २५ वर्षीय रोहिणीने गळफास घेऊन आत्महत्या केली होती. सुरुवातीला या आत्महत्येभोवती मोठे गूढ निर्माण झाले होते. मात्र, मृत रोहिणीचे वडील बाळू गिरजाप्पा शिवशरण (रा. अर्धनारी) यांनी दिलेल्या अधिकृत फिर्यादीवरून मंगळवेढा पोलिसांनी आरोपी पती निलेश पाराध्ये याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम १०८, ११५(२), ३५२ आणि ३५१(२) अन्वये गुन्हा दाखल केला असून, पोलीस या प्रकरणाचा पुढील तपास करत आहेत. दरम्यान, पोलिसांत दाखल झालेल्या एफआयआरनुसार, आरोपी पती निलेश हा रोहिणीला वारंवार टोमणे मारून मारहाण करायचा, तसेच तिला गंभीर परिणामांची धमकीही द्यायचा, असे नमूद करण्यात आले आहे. रोहिणीच्या वडिलांनी लावलेल्या या गंभीर आरोपांनंतर मंगळवेढा पोलिसांनी तपासाची चक्रे गतीने फिरवली आहेत.

**निधन वार्ता**

## शांताबाई महाजन

लोकशाही न्यूज नेटवर्क
जामनेर ✍ प्रतिनिधी



जामनेर येथील रहिवासी गं. भा. शांताबाई (मनुबाई) रामचंद्र महाजन (वय ९३) ता. जामनेर जि. जळगाव यांचे दि. १९ जून २०२६ शुक्रवार रोजी दुपारी ३:३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांची अंत्ययात्रा दिनांक २०/०६/२०२६ वार शनिवार रोजी सकाळी १०:३० वाजता राहते घर बजरंग पुरा सुतारगल्ली, जामनेर येथून निघेल त्या ऐनपूर येथील सरदार वल्लभभाई पटेल विदयालयाचे उपमुख्याध्यापक गोपाल रामचंद्र महाजन, दिनकर रामचंद्र महाजन, सुधाकर रामचंद्र महाजन यांच्या मातोश्री होत्या.

# पंतप्रधान मोदींच्या हस्ते २४०० कोटीचे लाभ वितरित

लोकशाही न्यूज नेटवर्क
नवी दिल्ली ✍ वृत्तसंस्था

रोजगार निर्मितीला चालना देणे आणि सामाजिक सुरक्षा व्यवस्था अधिक बळकट करण्याच्या उद्देशाने केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री विकसित भारत रोजगार योजना अंतर्गत लाभ वितरण कार्यक्रम शुक्रवारी नवी दिल्लीतील विज्ञान भवन येथे उत्साहात पार पडला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते देशभरातील लाखो लाभार्थ्यांना सुमारे २,४०० कोटी रुपयांचे लाभ वितरित करण्यात आले. या कार्यक्रमाला केंद्रीय श्रम व रोजगार तसेच युवा व्यवहार व क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया, केंद्रीय श्रम व रोजगार राज्यमंत्री तसेच एमएसएमई राज्यमंत्री शोभा करांदलाजे यांची प्रमुख उपस्थिती होती. देशभरातील विविध राज्ये आणि औद्योगिक केंद्रांमध्ये आयोजित करण्यात आलेल्या सुमारे २०० समांतर कार्यक्रमांना व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे मुख्य कार्यक्रमाशी जोडण्यात आले होतेयावेळी पंतप्रधान मोदी यांनी रोजगार निर्मिती, कौशल्य विकास आणि सामाजिक सुरक्षेच्या माध्यमातून विकसित भारताच्या उभारणीसाठी केंद्र सरकार कटिबद्ध असल्याचे सांगितले. औपचारिक क्षेत्रातील रोजगार वाढविणे आणि तरुणांना अधिकाधिक संधी उपलब्ध करून देणे हे सरकारचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे त्यांनी नमूद केले. योजनेच्या 'भाग अ' अंतर्गत पहिल्यांदाच नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांना एका महिन्याच्या ईपीएफ वेतनाइतके, कमाल १५ हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहनपर अनुदान दिले जाते. तर 'भाग ब' अंतर्गत अतिरिक्त रोजगार निर्माण करणाऱ्या पात्र नियोक्त्यांना प्रत्येक अतिरिक्त कर्मचाऱ्यासाठी दरमहा ३ हजार रुपयांपर्यंत आर्थिक प्रोत्साहन देण्यात येते. केंद्र सरकारने या योजनेसाठी ९९, ४४६ कोटी रुपयांची तरतूद केली असून १ ऑगस्ट २०२५ ते ३१ जुलै २०२७ या कालावधीत देशभरात ३. ५ कोटींहून अधिक रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवले आहे. योजनेमुळे तरुणांना औपचारिक क्षेत्रात रोजगार मिळण्यास मदत होणार असून सामाजिक सुरक्षा योजनांच्या कक्षेतही मोठ्या प्रमाणात वाढ होण्याची अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे. मुख्य कार्यक्रमासोबतच विविध राज्यांमध्ये आयोजित प्रादेशिक कार्यक्रमांमध्ये लाभार्थी, उद्योग प्रतिनिधी, नियोक्ते आणि कामगार संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले. नव्याने नियुक्त झालेल्या कर्मचाऱ्यांना नियुक्तीपत्रांचे वितरण करण्यात आले तसेच कामगार कल्याण योजना, ईपीएफओ सुविधा आणि अलीकडील कामगार सुधारणांबाबत जनजागृती करण्यात आली.


**मध्य रेल्वे**
**भुसावल मंडळ**
**विविध कार्य**

**ई-निविदा सूचना क्र.:** DRM(W) Bhusawal /२०/२०२६

भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने, विभागीय रेल्वे व्यवस्थापक (बांधकाम), मध्य रेल्वे, भुसावळ हे www.ireps.gov.in या संकेतस्थळावर नोंदणीकृत निविदाकारांकडून खालील कामांसाठी ई-निविदा (E-Tender) मागवत आहेत. १. कामाचे नाव: (ई-निविदा क्र. DRM W BSL 20 2026t1) (थोडक्यात नाव) ADEN CSN च्या कार्यक्षेत्रातील CSN-DHI विभागातील १२ सबवेज (LC क्रमांक) येथे पाणी साचण्याची समस्या रोखण्यासाठी गाळ काढणे, संप (sump) साफ करणे, तसेच RCC ड्रेन्स, क्रॉस ड्रेन, हम्प इत्यादींच्या माध्यमातून ड्रेनेज व्यवस्था सुधारणे व तिची देखभाल करणे. ( UMP 25-26, PH-30, SF, PID01.01.30.26.3.50.001), (i)अंदाजित खर्च: ₹३,६५,३७,१८०.०१, (ii) बिड सिक्युरिटी (अनामत रक्कम): ₹७,३०,८००/-, २. कामाचे नाव: (ई-निविदा क्र.DRM W BSL 20 2026t2) (थोडक्यात नाव) १) शेगाव रेल्वे स्थानक - हाय लेव्हल प्लॅटफॉर्म क्र. ३ (अप बाजू) ची १६ डब्यांवरून २४ डब्यांपर्यंत प्रस्तावित लांबी वाढवणे. (PID: 01.01.53.25.3.50.036). २)SSE (Wks) MKU च्या कार्यक्षेत्रातील आचेगाव, बोदवड, वरंगाव आणि खामखेड येथे दिव्यांगजन सुविधांची तरतूद; SSE (W) SEG च्या कार्यक्षेत्रातील खुमगाव-बुर्टी, बिस्वाब्रिज, वाडोदा आणि जालम रेल्वे स्थानकांवर दिव्यांगजन सुविधांची तरतूद; आणि SSE (W) AK च्या कार्यक्षेत्रातील पारस, श्रीक्षेत्र नागझिरी आणि गायगाव रेल्वे स्थानकांवर दिव्यांगजन सुविधांची तरतूद. :PID:01.01.53.25.3.50.029 3) SSE (W) मलकापूर कार्यक्षेत्र: प्लॅटफॉर्मचा पृष्ठभाग, सेवा इमारत (Service building ), पाणीपुरवठा व्यवस्था, व्हॅली गटर ( valley gutters), पावसाच्या पाण्याचा निचरा व्यवस्था, COP, FOB, ड्रेनेज व्यवस्था, प्लॅटफॉर्मची संरक्षक भिंत, रंगकाम इत्यादींची तातडीची दुरुस्ती Rev 2026-27), (i) अंदाजित खर्च: ३,८१,५३,०९४.१६, (ii) बोली सुरक्षा (Bid Security ): ७,६३,१००/-, ३. कामाचे नाव: (E-TENDER NO.DRM W BSL 20 202613) (थोडक्यात नाव) मध्य रेल्वेच्या भुसावळ विभागातील कार्यरत असलेल्या EEC बनावटीच्या ६ डिजिटल वेल्ड टेस्टर USFD मशिन्ससाठी (मॉडेल क्र. DS-51 AS, DS-52 AS, DS-53 AS, DS-54 AS, DS-55 ASआणि DS-56AS) सुटे भाग (spares) पुरवण्यासह वार्षिक देखभाल करार (AMC) - कालावधी १ वर्ष. (i) अंदाजित खर्च: ₹७,७०,५३०.५६, (ii) बोली सुरक्षा: ₹१५,४००/-, ४. कामाचे नाव: (E-TENDER NO.DRM W BSL 20 2026t4) (थोडक्यात नाव) १) भुसावळ (१५ ब्लॉक) - भुसावळ येथील एलोरा कॉलनीमधील १५ ब्लॉकच्या कर्मचारी निवासस्थानांमध्ये सुधारणा आणि भूमिगत ड्रेनेजची तरतूद. : PID: 01.01.51.25.3.50.021 २) BSL (भुसावळ) स्थानक परिसर: SSE/Wks/Station/BSL कार्यक्षेत्रांतर्गत RBIII प्रकारच्या ८ नवीन कर्मचारी निवासस्थानांचे प्रस्तावित बांधकाम. : PID: 01.01.51.25.3.50.023, (i) अंदाजित. किंमत: ₹४,४७,८३,५५१.०२, (ii) बोली सुरक्षा (Bid Security ): ₹८,९५,७००/-. टीपा- (I) अनुक्रमांक १, २, ३ आणि ४ च्या निविदा बंद होण्याची तारीख व वेळ: ०८.०७.२०२६ रोजी १५:०० वाजेपर्यंत. (II) इच्छुक निविदाकारांना विनंती आहे की, निविदा आणि काही शुद्धिपत्रके (Corrigendum) असल्यास त्यासंबंधीच्या तपशीलांसाठी www.ireps.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी. (III) ही निविदा सूचना डीआरएम (वर्क्स) कार्यालय, भुसावळ येथील सूचना फलकावरही प्रदर्शित करण्यात आली आहे. (IV) निविदाकार केवळ www.ireps.gov.in या संकेतस्थळाद्वारेच वरील ई-निविदेत इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सहभागी होऊ शकतात; ई-निविदेसाठी प्रत्यक्ष (मॅन्युअल) प्रस्ताव सादर करण्यास परवानगी नाही आणि असे कोणतेही प्रस्ताव सादर केल्यास ते उघडले किंवा विचारात घेतले जाणार नाहीत. (V) निविदा दस्तऐवजाचे शुल्क आणि ईएमडी (EMD) ची रक्कम पोर्टलवर उपलब्ध असलेल्या नेट बँकिंग, डेबिट/क्रेडिट कार्ड इत्यादी ऑनलाइन पेमेंट पद्धतींद्वारे भरता येईल.

म.रे.व्य. (का.)

धोकादायक आणि स्फोटक वस्तू घेऊन प्रवास करणे हा दंडनीय गुन्हा आहे. 05



**जाहिर नोटीस** ॲड.व्ही.एम.महाजन

भडगाव येथील मे. दिवाणी न्यायाधीश क. स्तर साो. यांचे न्यायालयात

**दि.कि.अर्ज नं.५१/२०२६ चौकशी तारीख २७/०७/२०२६**

**अर्जदार :-** १] सुभाष वेडू माळी उ.व. ५० धंदा शेती [२] ज्ञानेश्वर वेडू माळी उ.व.४७ धंदा शेती [३] राजेंद्र वेडू महाजन [माळी] उ.व.४५ धंदा शेती [४] शेनपडाबाई वेडू माळी उ.व.७४ धंदा वयोवृध्द, अर्जदार १ ते ४ रा.गुढे ता. भडगांव जि.जळगाव [५] आशाबाई ईश्वर माळी उ.व.४४ धंदा गृहिणी, रा. खेडगांव खु. ता. भडगांव जि. जळगाव

**//विरुध्द//**

कोणीही नाही ..... **सामनेवाला**

**अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट २ व ३ प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज**

ज्याअर्थी अर्जदार वरील ठिकाणी राहत असून अर्जदार क्र. १ ते ३ हे **कै. वेडू बलदेव माळी** यांचे मुले असून अर्जदार नं. ४ हि पत्नी आहे. तसेच अर्जदार नं. ५ हि मुलगी आहे. **कै. वेडू बलदेव माळी हे दि. ०७/१०/२०१० रोजी मयत** झाले असून **कै. वेडू बलदेव माळी** हे गुढे ता. भडगाव जि. जळगाव येथील कायमचे रहिवासी होते. **कै. वेडू बलदेव माळी** यांची **आई नामे कै.हौसाबाई बलदेव माळी हि सन १९६५ मध्ये मयत** झालेली आहे.**[परंतु त्यांची मृत्यू नोंद करण्यात आलेली नाही]** अर्जदार हे मयताचे वारस आहेत. **कै. वेडू बलदेव माळी** यांचे पश्चात अर्जदारानव्यतिरिक्त अन्य कोणीही वारस नाही. **कै. वेडू बलदेव माळी** यांचे वारस दाखल्याची अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामी आवश्यकता आहे.त्यामुळे **कै. वेडू बलदेव माळी** यांचा वारस दाखला मिळणेकामी अर्जदारांना सदरचा अर्ज मे. न्यायालयात दाखल करणे भाग झाले आहे.तरी वरील अर्जदार यांनी वरस दाखला मिळणेकामी मे भडगाव न्यायालयात **बॉम्बे रेग्युलेशन कलम २ व ३ वारस दाखल केलेला आहे.** तरी त्याबाबत कोणाचीही काहीएक हरकत असल्यास त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत भडगाव कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्यात. अन्यथा कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन मे. कोर्ट योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल..आज दिनांक **१८/०६/२०२६** रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी आमच्या सहीनिशी दिले असे.

**सही/-** **कोर्टाचा शिक्का** **हुकूमावरुन**
**कनिष्ठ लिपीक** **सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय**
**भडगाव जि. जळगाव**


## तब्बल २५ वर्षांनंतर विधानसभेत राष्ट्रगीत

**चेन्नई** – अभिनेते असलेले विजय थलपती तमीळनाडूचे मुख्यमंत्री झाले आहेत. त्यांच्या सरकारच्या अधिवेशनाच्या सुरवातीलाच राज्यपालांच्या अभिभाषणानंतर राष्ट्रगीत गायले गेले. तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत टीव्हीकेच्या विजयानंतर आणि थलपथी विजय मुख्यमंत्री झाल्यानंतर हा सर्वात मोठा बदल समोर आला आहे. गुरुवारी, तामिळनाडूचे राज्यपाल राजेंद्र विश्वनाथ अर्लेकर यांच्या अभिभाषणानंतर राष्ट्रगीत वाजवण्यात आले.


**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM "RAFIQUE R.TADVI" TO "RAFIQUE RUBAB TADAVI".

**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM "SHAKILABANO" TO "SHAKILABANO RAFIQUE TADAVI".



**महाराष्ट्र शासन**
**तहसिलदार पाचोरा यांचे कार्यालय**

टेलिफोन नं.०२५९६/२४०६११ Email Id:-tahsilpachora@gmail.com

क्रमांक/जन्म-मृत्यु/जा.प्र./५४/२०२६ दिनांक - स्वाक्षरी खाली नमूद पहावे

**-: जाहीर प्रगटन :-**

सदर जाहीर प्रकटनाव्दारे सर्व नागरिकांना कळविण्यात येते की,**श्री निखिल दिलीप पाटील रा.पाचोरा ता. पाचोरा यांनी त्यांचा स्वत:चा जन्मनोंदीचा आदेश** मिळण्याकामी इकडील कार्यालयास अर्ज सादर केलेला आहे. त्याअनुषंगाने सदरची माहिती खालीलप्रमाणे नमूद करण्यात आली आहे.

| अ.क्र | अर्जदार यांचे नाव | गावाचे नाव | अर्जदार यांची जन्म तारीख |
|---|---|---|---|
| १ | श्री निखिल दिलीप पाटील | पाचोरा | दिनांक ०२/०५/१९९३ |

तथापि सदर प्रस्तावात नमूद केले प्रमाणे अर्जदार यांच्या **जन्मनोंदीबाबत अथवा जन्मतारखेबाबत** कोणाचीही काही हरकत असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झालेपासुन १५ दिवसाच्या आत मे. तहसिलदार पाचोरा ता. पाचोरा जि. जळगांव येथे स्वत: अथवा निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत आपली लेखी स्वरुपात व उचीत कागदपत्रांच्या पुराव्यासह हरकत नोंदवावी. अन्यथा कोणाची काहीएक हरकत नाही असे समजुन उक्त अर्जाची एकतर्फी सुनावणी घेवून **जन्माची नोंद** घेणे बाबतचा आदेश पारीत करण्यात येईल.

**सही/-**
**विजय बनसोडे**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी पाचोरा**



**जिल्हा वक्फ अधिकारी कार्यालय,**
**महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, जळगाव**
**पत्ता -**प्लॉट नंबर १०,झाकीर हुसैन सोसायटी,एच.पी.पेट्रोल पंपाच्या मागे, एच.जे.थीम इकरा कॉलेज रोड, मेहरुण जळगाव - ४२५००१
wsbsite:ww.mahawakf.com Tele:0257-2217860 Email.dwojalgaon@mahawakf.com

**क.वक्फ/जळगाव/चौकशी/२४५/२०२६ दिनांक १७/०६/२०२६**
**संचिका क्र. ६९/२२३/२०२६**

**जाहिर प्रगटन**

उम्मीद अधिनियम १९९५ च्या कलम ६९ अन्वये वक्फ संस्थेच्या योग्य प्रशासनाकरीता योजना मंजूर करणेबाबत....

वक्फ संस्थेचा नाव व पत्ता - Masjid and Madarsa Tohid, V/o.Jargaon,Tal.Pachora, Dist .Jalgaon

उपरोक्त वक्फ संस्था महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळात क्र.MSBW/JGN/४८९/२०१६ अन्वये नोंदणीकृत असून **अर्जदार श्री.फिरोज सिकंदर खान व इतर रा.मौ. जारगाव ता.पाचोरा जिल्हा जळगाव यांनी दि.१५/०६/२०२६ रोजीच्या** अर्जान्वये सदर संस्थेच्या व्यवस्थापनाकरीता महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळाकडे प्रारुप योजना दाखल केलेली आहे. प्रारुप योजनेतील तरतूदीनुसार विश्वस्तांचा कार्यकाळ ५ वर्षाचा असून व्यवस्थापन समिती निवडीची रित निवडणूक पध्दत आहे. योजनेमध्ये नमूद प्रस्तावित व्यवस्थापन समिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र | नाव | पद |
|---|---|---|
| १ | श्री फिरोज सिकंदर खान | अध्यक्ष |
| २ | श्री खुशरु खान दिलावर खान पठाण | उपाअध्यक्ष |
| ३ | श्री आसीम राजे खान | सचिव |
| ४ | श्री तबरेज सिकंदर खान | खजिनदार |
| ५ | श्री फहीम अहेमद अब्दुल कय्युम शेख | सदस्य |
| ६ | श्री मुबारक सुपडू खान | सदस्य |
| ७ | श्री जावेदखान सिराजखान पठाण | सदस्य |

सदर प्रारुप योजनेबाबत काही तक्रार, आक्षेप असल्यास संबंधितांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ८ दिवसाच्या आत, जिल्हा वक्फ अधिकारी ,कार्यालय जळगाव पत्ता - प्लॉट नंबर १०,झाकीर हुसैन सोसायटी,एच.पी.पेट्रोल पंपाच्या मागे,एच.जे.थीम इकरा कॉलेज रोड, मेहरुण जळगाव - ४२५००१ येथे आपले म्हणणे दाखल करावे. विहीत वेळेनंतर आक्षेप प्राप्त झाल्यास त्याची दखल घेण्यात येणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सही/-**
**[मुतवल्ली आसिफ अहेमद]**
**जिल्हा वक्फ अधिकारी**
**जळगाव**



मकामुना[जे-१९६/५-८६-२५-००पाए४ शा.नि.न्या.वि.क.७९१ दि.११/२/९० ब दिवाणी पुस्तिका १९६० संच दोन प्र ५१९ नमुना क १]

**ॲड.एम.एस.अग्रवाल**

**पब्लीकेशन नोटीस**

**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११/२०२६**
प्रकरण तेरा- नमुना क्र. १ [परिच्छेद २६० पृष्ठ८७]
१९२५ च्या अधिनियम एकोणचाळीस याचे कलम २८३ याव्दारे आवश्यक असलेल्या नोटीशीचा नमुना कलम ३७३
**दिवाणी व फौजदारी न्यायालय क. स्तर, बोदवड न्यायालयात**
**दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११/२०२६**
**निशाणी क्रमांक २३**

सामान्यत: रा. बोदवड ता. बोदवड जि. जळगाव ,संपत्ती बाळगणार **मयत माणकचंद खुमचंद अग्रवाल** च्या मृत्युपत्राचे संप्रमाणे यावरुन व्यक्ती च्या इस्टेटीचे प्रशासनपत्र याबाबत च्या उत्तराधिकारी

**अर्जदार :-** १] किरणबाई माणकचंद अग्रवाल वय ६५ वर्ष कामधंदा घरकाम [२] निलेश माणकचंद अग्रवाल वय ४२ वर्ष कामधंदा व्यवसाय [३] लोकेश माणकचंद अग्रवाल वय ४० वर्ष,कामधंदा व्यवसाय [४] सौ.महक तुषार अग्रवाल वय सज्ञान वर्ष, कामधंदा घरकाम, सर्व रा. जय माता दी नगर, बोदवड ता. बोदवड जि. जळगांव

**//विरुध्द//**

कोणीही नाही **... सामनेवाले**

यांस याव्दारे पुढील प्रमाणे नोटीस देण्यात येत आहे की, अर्जदार यांनी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट प्रमाणे वारस दाखला मिळणेसाठी अर्ज केला आहे. **मयत माणकचंद खुबचंद अग्रवाल यांचा मृत्यू अर्जातील दिनांका प्रमाणे १४/०९/२०२५ रोजी मृत्यू झाला [दि.१९/०९/२०२५ रोजीचे मृत्यूदाखला जोडून]** यांच्या मृत्यूपश्चात अर्जदार १ ही मयताची पत्नी व अर्जदार २ व ३ हे मयताचे मुले तसेच अर्जदार नं. ४ ही मयताची मुलगी आहे.**मयत माणकचंद खुबचंद अग्रवाल यांचे नावे एच.डी.एफ.सी.बॅक मध्ये कर्ज प्रकरण होते. तेथे त्यांनी त्यांचे हयातीत मौजे बोदवड येथील गट क्र. २३८/२ चे मुळ खरेदीखत जमा केले होते.** सदरचे कर्ज पूर्णपणे फेडण्यात आलेले असून बॅकेत जमा असलेले मुळ खरेदीखत परत मिळणेसाठी अर्जदार यांनी विनंती केले असता त्यांना संबंधित बॅकेने मे. कोर्टातुन **वारस दाखला आणणेचे दि. ०८/०१/२०२६ रोजी लेखी कळविले** तसेच **मयत माणकचंद खुबचंद अग्रवाल** हे मयत झाले नंतर अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहे तसेच अर्जदार यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी व इतर आवश्यक कामासाठी वारस दाखल्याची आवश्यकता आहे. त्याकरीता अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकामी या न्यायालयात **दि. १३/०३/२०२६ रोजी अर्ज दाखल केलेला असून** त्यात असे निवेदिलेले आहे की, सदर मृत व्यक्ती **मयत माणकचंद खुबचंद अग्रवाल** रा. बोदवड ता. बोदवड जि. जळगाव येथे सामान्यत: राहत होते [किंवा संपत्ती बाळगून होते] व ते **दि. १४/०९/२०२५ रोजी रा बोदवड ता. बोदवड** जि. जळगाव येथे मयत झालेले असुन [अर्जदार यांनी मृताचे वारस म्हणून] वारस दाखला मिळणेकामी या अधिकाराने मे. दिवाणी व फौजदारी न्यायालय बोदवड येथे सदर अर्जाच्या **चौकशीसाठी व सुनावणीकरीता दि. २२ माहे जुलै २०२६ हा दिवस निश्चित केलेला आहे**. सदर अर्जदार हे मयताचे वारस नव्हे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने हया कोर्टात हजर होउन आपल्या हरकती कळवाव्या आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरील अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिल्यास सदर अर्जदारांना **मयत माणकचंद खुबचंद अग्रवाल** यांचे वारस दाखला देण्यात येईल. **आज दि. १८/०६/२०२६ रोजी** माझे सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली असे.

**कोर्टाचा शिक्का** **आदेशावरुन**
**सही/-**
**सहा.अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय बोदवड**


लोकशाही दैनिक हे लोकशाही इनोवेशन्स प्रायव्हेट लिमिटेड यांच्या मालकीचे असून त्यांच्या वतीने मुद्रक आणि संपादक शांता कमलाकर वाणी, प्रकाशक राजेश कमलाकर यावलकर यांनी लोकशाही ऑफसेट एम-१६९ , एमआयडीसी जळगाव जिल्हा जळगाव ४२५००२ (महाराष्ट्र) येथून छापून २२०, बळीराम पेठ, जळगाव जिल्हा जळगाव ४२५००१ महाराष्ट्र येथे प्रसिद्ध केले.
Lokshahi Dainik is owned by Lokshahi Innovations Private Limited and is Printed by the Printer and Editor - Shanta Kamlakar Wani Publisher - Rajesh Kamlakar Yawalkar, at Lokshahi Offset M-169, MIDC Jalgaon District Jalgaon 425002 (Maharashtra) and published at 220, Baliram Peth, Jalgaon District Jalgaon 425001 Maharashtra. आर.एन.आय.नं MAHMAR/2009/33028 पोस्टल रजी. नंबर No.JAL/16/2024-26 EMail- lokshahilive@gmail.com, वर्ष १६ वे. जळगाव फोन नं. ०२५७-२२३७४९१,२२४१४९१,२९७०३६८. संपर्क कार्यालय: मुंबई- १०, शंकेश्वर सोसायटी, मानपाडा रोड, नवजीवन हॉस्पीटल समोर, डोंबीवली पूर्व जि. ठाणे, मो. नं. ९४२२२८४५११. सहाय्यक संपादक राजेश यावलकर, सल्लागार संपादक धों. ज. गुरव, (पी. आर. बी. कायद्यानुसार) संपादकीय जबाबदारी यांची आहे.

**लोकशाही**

**संपादकीय**

## वाघ नगर परिसरात भीषण पाणीटंचाई!



जळगाव शहरालगत असलेल्या परंतु विधानसभेच्या ग्रामीण मतदार संघात येणाऱ्या वाघ नगर व सावखेडा परिसरात भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. या ठिकाणी पंधरा दिवसातून एकदा पाणी नळाला येते, ते देखील कमी फोर्सने येते. त्यामुळे काही नळांना पाणी येते व काही भागात पाणीच येत नाही अशी अवस्था निर्माण झाली आहे. गेल्या अनेक दिवसांपासून येथील नागरिक त्रस्त झाले आहेत. पाण्यासाठी त्यांना वणवण भटकावे लागत आहे. गेल्या आठ जून रोजी देखील सर्व मंडळींनी पाण्यासाठी इशारा दिला होता की, आम्हाला नियमित पाणी नाही दिले तर आम्ही मंत्र्यांच्या घरावर मोर्चा काढू. सुदैवाने वाघ नगर परिसर हा पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या मतदारसंघात मोडत आहे. पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांचे मतदार संघात पाणीटंचाईची अवस्था असल्याने वाघ नगर परिसरात जनता त्रस्त झाली आहे. आज सुमारे २०० महिलांनी हंडा मोर्चा काढला होता. आम्हाला नियमित पाणी द्या, अन्यथा खुर्ची रिकामी करा.. असे वाघनगर रहिवासी महिलांचे म्हणणे होते. त्यामध्ये वंचित बहुजन आघाडी देखील सामील झाली आणि मोर्चे करी महिलांना बहुजन आघाडीची साथ मिळाली. बहुजन आघाडीचे म्हणणे आहे की, वाघ नगर परिसरात पाणी मिळत नाही त्याला कारणीभूत हे पाण्याचे अयोग्य नियोजन होय. पाईपलाईन नेहमी फुटते. पाण्याची पाईपलाईन जी टाकली आहे ती जमिनीच्या अत्यंत वर टाकली असल्याने ती सातत्याने फुटते आणि पाणी घरापर्यंत पोहोचण्याऐवजी रस्त्यातच वाहत जाते. यात शहर आणि ग्रामीण असा वाद असून जळगाव शहर महानगरपालिका म्हणते की ग्रामपंचायत पाणीपुरवठा करेल आणि ग्रामपंचायत म्हणते की जळगाव शहर महानगरपालिकेने पाणी द्यायला हवे. या दोन्हींच्या वादात बिचारे वाघानगर व सावखेडा परिसरातील जनतेचे मात्र हाल होत आहेत. पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात हा परिसर येत असल्याने पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांची जबाबदारी येथे महत्त्वाची आहे. मात्र पाणीपुरवठा मंत्री फक्त बघायची भूमिका घेत असल्याने वाघनगर वासियांवर हे संकट ओढावले आहे. वाघ नगर परिसरात लोकांनी ५० लाख रुपयांची घरे घेतली आहेत, पण आज अवस्था अशी आहे. की त्यांच्या घरात नळाला पाणीच येत नसल्याने घरात बायका पोरं आणि सर्व मंडळी संडास करण्यासाठी सुद्धा पाणी नसल्याने उघड्यावर जात आहेत, अशी अवस्था आहे. तेव्हा पाण्याअभावी काही होत नाही. पाणी नसेल तर वणवण भटकावे लागते. घरातील महिलांना दिवसभर हेच काम असते की हंडा घेऊन पाणी गोळा करणे. पिण्याला पाणी मिळाले की दोन-चार दिवस अंघोळीला सुट्टी. अशा प्रकारे वाघ नगर परिसरातील जनता आपले दिवस काढत आहेत. त्यामुळे संतप्त महिलांनी आज हंडा मोर्चा काढून आपला रोष व्यक्त केला. त्याला बहुजन समाज आघाडीने साथ दिली. आता हंडा मोर्चा मंत्र्यांच्या घरी न्यायचा नाही, तर अधिवेशन नात विधानसभेवर हंडा मोर्चा नेण्याचे बहुजन समाज आघाडीने ठरवले आहे.

वाघ नगर परिसरातील जनता पाण्यासाठी वैतागले आहे. ग्रामपंचायतकडून होणार नसेल तर जळगाव शहर महानगरपालिकेतर्फे त्यांना पाणीपुरवठा करावा अशी मागणी त्यांची रास्ता आहे. त्यात पालकमंत्री आणि पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांनी पुढाकार घेऊन त्यातील पाण्याचा प्रश्न मिटवावा, अशी या भागातील जनतेचे म्हणणे आहे. पालकमंत्री काही पुढाकार घेत नाहीत आणि प्रश्न मात्र सुटत नाही, अशी अवस्था निर्माण झाली आहे. पंधरा दिवसाला एकदा नळाला पाणी येते म्हणजे फार भयंकर आणि असह्य असा प्रकार म्हणता येई.ल उशाला जळगाव शहर महानगरपालिका असताना, तेथे पाणी भरपूर असताना जळगाव महानगरपालिकेची जबाबदारी येते की पाणी द्यायला हवे. पण ते का पुरवले जात नाही? हा देखील मोठा प्रश्न आहे. आपल्या शेजारच्या उपनगरात पाणी देणे हे आपले कर्तव्य असताना ते का केले जात नाही? हा मोठा प्रश्न आहे. ग्राम पंचायत आणि शहर या दोघांच्या वादात बिचारे वाघनगरवासी मात्र पाण्यासाठी धडपडत आहेत. ते इतके वैतागले आहेत की आता मंत्रालयावरच मोर्चा न्यायचा तेव्हाच त्यांना आमच्या व्यथा कळतील. पाण्यासाठी काय हाल होतात ते कळेल, अन्यथा कळणार नाही. पाणी उशाला आणि कोरड घशाला अशी त्यांची अवस्था झालेली आहे. वाघ नगरला लागून असलेल्या जळगाव शहरवासियांना भरपूर पाणी उपलब्ध असताना त्यांच्या शेजारी वाघनगर मध्ये मात्र लोकांना पाणी मिळत नाही त्यासाठी त्यांना वणवण भटकावे लागत लागते. याला काय म्हणावे? तातडीने वाघनगरचा पाणी प्रश्न मिटवून त्यांना पाणी उपलब्ध करून देऊन त्यांच्या समस्या जळगाव शहर महानगरपालिकेने सोडवावी. पालकमंत्री काय करतील ते करतील.. ते काही करोत अथवा न करत.. पण वाघ नगर वासियांना पाणी मिळावे ही अत्यंत आवश्यक बाब आहे...!

# धानोरा मराठी शाळेत १५ वर्षांपासून मुख्याध्यापक ठाम मांडून!

**भौतिक सुविधांचा बोजवारा : ६ फुटांचे खड्डे उघडेच; अपघाताची भीती**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**धानोरा, ता. चोपडा** प्रतिनिधी

येथील जिल्हा परिषद केंद्र शाळेचा कारभार रामभरोसे चालला असून, शाळेतील गंभीर समस्यांमुळे विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. पहिली ते चौथीपर्यंत वर्ग असलेल्या या शाळेत जवळपास २५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांना शिकवण्यासाठी ९ शिक्षक कार्यरत आहेत, तर एका मुख्याध्यापकांकडे शाळेची धुरा आहे. मात्र, गेल्या काही महिन्यांपासून शाळेच्या आवारात निर्माण झालेली परिस्थिती पाहता, पालक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. विशेष म्हणजे येथील मुख्याध्यापक गेल्या १५ वर्षांपासून एकाच जागी ठाण मांडून आहे.





> “लहान मुले खेळताना खड्ड्यात पडली आणि काही बरे-वाईट झाले तर त्याला जबाबदार कोण? गेल्या पंधरा वर्षांत शाळेची अवस्था सुधारण्याऐवजी खालावत चालली आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांनी यात तातडीने लक्ष घालून मुख्याध्यापकांची बदली करावी आणि शाळेतील समस्या सोडवाव्यात, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल.
> **– माया सोनवणे, पालक**

**१५ वर्षांपासून एकच मुख्याध्यापक; बदलीसाठी पालक आक्रमक**

या सर्व गैरसोयींमागे शाळा प्रशासनाचे आणि मुख्याध्यापकांचे ढिसाळ नियोजन कारणीभूत असल्याचे बोलले जात आहे. विशेष म्हणजे, संबंधित मुख्याध्यापक गेल्या १५ वर्षांपासून याच शाळेत ठाण मांडून आहेत. इतकी वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असूनही शाळेचा कोणताही भौतिक विकास झालेला नाही, उलट सुविधांचा बोजवारा उडाला आहे. त्यामुळे या मुख्याध्यापकांची येथून तत्काळ बदली करण्यात यावी, अशी जोरदार मागणी आता पालकांनी आणि ग्रामस्थांनी लावून धरली आहे.

शाळा परिसरात एका ठिकाणी तब्बल ५ ते ६ फूट खोलीचे पाच मोठे खड्डे खोदून ठेवण्यात आले आहेत. गेल्या चार महिन्यांपासून हे खड्डे अत्यंत निष्काळजीपणे असेच उघडे सोडून देण्यात आले आहेत. पहिली ते चौथीमधील लहान मुले खेळताना किंवा धावताना या खड्ड्यांमध्ये पडून मोठा अनर्थ घडण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या गंभीर धोक्याकडे शाळा प्रशासनाने पूर्णपणे डोळेझाक केली असल्याचा आरोप पालकांनी केला आहे. शाळेतील भौतिक सुविधांची पुरती वाट लागली असून, स्वच्छतागृहांची अवस्था अत्यंत दयनीय आहे. विद्यार्थ्यांसाठी असलेले शौचालय सुव्यवस्थित नसून, मूतारी पूर्णपणे खराब झालेली आहे. यामुळे लहान मुलांना प्रचंड त्रासाला सामोरे जावे लागत असून, विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही निर्माण झाला आहे. डिजिटल आणि प्रगत शाळांचे दावे केले जात असताना, धानोरा केंद्र शाळेत मूलभूत सुविधाही उपलब्ध नसल्याने संताप व्यक्त होत आहे.

## बुलंद छावा मराठा युवा परिषद जिल्हा सचिवपदी ज्ञानेश्वर वाघ

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**सोयगाव** प्रतिनिधी



बुलंद छावा मराठा युवा परिषदेच्या छत्रपती संभाजीनगर जिल्हा सचिवपदी ज्ञानेश्वर वाघ यांची अत्यंत प्रतिष्ठेने नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे प्रदेश सचिव सुरेश वाकडे यांच्या शुभहस्ते वाघ यांना अधिकृत नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले. ज्ञानेश्वर वाघ यांनी आजवर सामाजिक क्षेत्रात केलेल्या अविरत आणि उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन संघटनेने त्यांच्यावर ही महत्त्वपूर्ण जबाबदारी सोपवली आहे. यावेळी सतीश वेताळ, संदीप जाधव, हंसराज पाटील, योगेश देशमुख, शिवाजी पळसकर प्रामुख्याने उपस्थित होते. यासोबतच डॉ. कृष्णा कदम, रामेश्वर राजगुरे, दिलीप जाधव, ऋषिकेश मोहिते, शिवनाथ वाडेकर आणि विष्णू आमटे यांच्यासह संघटनेचे इतर अनेक सन्माननीय पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांनी ज्ञानेश्वर वाघ यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

## भातखंडे येथे पाच ते सहा दिवसांनी पाणीपुरवठा

**नागरिक त्रस्त, पर्यायी व्यवस्थेची मागणी**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भातखंडे** प्रतिनिधी

भातखंडे गावात ग्रामपंचायतीमार्फत घरगुती नळांना करण्यात येणारा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा सध्या पाच ते सहा दिवसांच्या अंतराने होत असल्याने ग्रामस्थांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. वाढत्या उष्णतेमुळे व पाण्याच्या टंचाईमुळे नागरिकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले असून ग्रामपंचायतीने तातडीने पर्यायी पाणीपुरवठा व्यवस्था उभारावी, अशी मागणी होत आहे. गावातील उपलब्ध बोरवेल, जिवंत विहिरी तसेच इतर जलस्रोतांचे सर्वेक्षण करून त्यांचा तात्पुरता वापर करण्याची गरज व्यक्त केली जात आहे. नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होण्यासाठी ग्रामपंचायतीने त्वरित नियोजन करून आवश्यक उपाययोजना कराव्यात, अशी अपेक्षा ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भातखंडे गावाला पिण्याचे पाणी गिरणा नदीलगत असलेल्या विहिरीतून पुरविले जाते. मात्र त्या परिसरातील पाण्याची पातळी कमी झाल्याने पुरवठ्यावर परिणाम होत असल्याचे सांगितले जात आहे. तसेच गिरणा धरणात सध्या सुमारे ३० टक्के पाणीसाठा शिल्लक असल्याची माहिती आहे. दरम्यान, राज्यातील पावसाची परिस्थिती व गिरणा धरणातील उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता जिल्हाधिकाऱ्यांनी ३१ ऑगस्टपर्यंत धरणातून पाणी न सोडण्याचे निर्देश दिल्याचे समजते. त्यामुळे आगामी काळात पाणीटंचाई अधिक गंभीर होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. अशा परिस्थितीत ऐनवेळी उपाययोजना करण्याऐवजी आतापासूनच नियोजन करून नागरिकांना नियमित व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यासाठी ग्रामपंचायतीने युद्धपातळीवर प्रयत्न करावेत, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. गावातील पाणीप्रश्न तातडीने सोडविण्यासाठी प्रशासनानेही लक्ष घालण्याची गरज असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

## महाराष्ट्र चेंबर व्यवस्थापन समितीवर वेदांशू पाटील

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी



महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अ‍ॅण्ड अ‍ॅग्रिकल्चर (एमएसीसीआयए)च्या व्यवस्थापन समिती सदस्यपदी अमळनेरचे युवा उद्योजक वेदांशू पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. चेंबरचे अध्यक्ष रवींद्र माणगावे यांनी विशेष अधिकारातून ही नियुक्ती केली आहे. गव्हर्नमेंट कॉन्ट्रॅक्टिंग, शिक्षण, मनोरंजन आणि ई-कॉमर्स क्षेत्रात कार्यरत असलेल्या वेदांशू पाटील यांची निवड त्यांच्या उद्योजकीय अनुभव व संघटन कौशल्याच्या आधारे करण्यात आल्याचे सांगण्यात आले. महाराष्ट्र चेंबरच्या इतिहासातील सर्वांत तरुण सदस्य म्हणून त्यांची नोंद होण्याची शक्यता आहे. दरम्यान, अमळनेर येथील मंगळग्रह सेवा संस्थेचे अध्यक्ष डॉ. डिगंबर महाले यांची गव्हर्निंग कौन्सील सदस्यपदी बिनविरोध निवड झाली आहे. नियुक्तीबद्दल वेदांशू पाटील यांनी अध्यक्ष रवींद्र माणगावे व चेंबरच्या सर्व नेतृत्वाचे आभार मानत संस्थेच्या विकासासाठी कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## चोपडा ते पंढरपूर दिंडीतील वारकऱ्यांसाठी एक लाखाचा विमा काढणार : जगन्नाथ बाविस्कर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

शहरातील श्री विठ्ठल मंदिर येथून २७ जून २०२६ रोजी स. ८ वा. श्रीक्षेत्र पंढरपूर पायी दिंडीचे प्रथम वर्ष प्रस्थान होत असून या दिंडीत सहभागी होणाऱ्या सर्व वारकऱ्यांचा नामांकित विमा कंपनीकडून एक वर्षासाठी रू. १०००००/- एक लाखाचा जनता अपघात विमा काढण्यात येणार आहे, अशी माहिती दिंडी सेवक/ ग्रामगीता प्रचारक जगन्नाथ बाविस्कर (गोरगावलेकर) यांनी ह्या पत्रकान्वये दिली आहे. प्रथमच दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने चोपडा ते पंढरपूर संकीर्तन आषाढी वारी पायी पालखीरथ दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आलेले आहे. एकूण २२ मुक्काम करून २३ व्या दिवशी दिंडी पंढरपुरात पोहचणार आहे. दररोज वारकऱ्यांना २०/२२ कि. मी. अंतर चालावे लागणार आहे. त्या दरम्यान त्या त्या गावांतील दानशूर व्यक्तींकडे चांगल्या पद्धतीने सेवासुविधेसाठी ठेपे बांधण्यात आलेले आहेत. वारकऱ्यांच्या आरोग्यासाठी प्राथमिक उपचार म्हणून सर्वप्रकारच्या गोळ्या औषधी सोबत घेण्यात येणार आहेत. तरीही वेळोवेळी आवश्यक त्याठिकाणी वारकऱ्यांची वैद्यकीय तपासणी केली जाणार आहे. विशेष प्रथम वर्ष व यापुढेही दरवर्षी दिंडीतील वारकऱ्यांसाठी एक वर्षासाठी रू. एक लाखाचा जनता अपघात विमा उतरण्यात येणार असल्याने जास्तीत जास्त वारकऱ्यांनी ह्या दिंडीत सहभागी व्हावे. सोबत आधार कार्डची झेरॉक्स व ओळखपत्रासाठी एक पासपोर्ट फोटो आणावा, असेही आवाहन दिंडी संचालक जगन्नाथ बाविस्कर (ह. मु. देशमुख नगर, चोपडा) यांनी केले आहे.

## शेंदुर्णी ते सोयगाव रस्त्यावर अपघाताचा धोका

**काटेरी झुडपे तसेच अर्धवट रस्ता जीवघेणा : संबंधित यंत्रणेला नोटीस**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**शेंदुर्णी ता. जामनेर** प्रतिनिधी

खान्देश आणि मराठवाड्याला जोडणारा शेंदुर्णी ते सोयगाव रस्ता समस्येचे माहेरघर ठरत आहे. रस्त्याने दुतर्फा वाढलेल्या काटेरी झुडपे यामुळे वाहनधारकांना मोठ्या समस्येला तोंड द्यावे लागते आहे. दोन ठिकाणी अवघड वळणावरच रस्त्याच्या बाजुला ही झुडपे वाढल्याने समोरचं वाहन दिसत नाही यामुळे अनेक अपघात झाले असुन अनेक निरपराधांना आपले जीव गमवावे लागले आहेत.



शेंदुर्णी येथील पाण्याच्या टाकीजवळ रस्त्याचे काम झाले मात्र ४० ते ५० फुट रस्ता तसाच पडुन राहिला आहे. याचा वाहनधारकांना पायी घालणाऱ्यांना मनस्ताप सहन करावा लागतो. पावसाळ्यात या ठिकाणी तीन चार फुट पाणी साचते यामुळे वाहतुकीची समस्या निर्माण होते. वाहने दोन्ही बाजुला उभी करावी लागतात. पाण्याचा योग्य निचरा न केल्याने दरवर्षी ही समस्या निर्माण होत आहे. तरी या दोन्ही समस्या विचारात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभाग जामनेर व सार्वजनिक बांधकाम विभाग सोयगाव यांच्या मुख्य अभियंता यांना शेंदुर्णी येथील माजी नगरसेवक अ‍ॅड. धर्मराज सुर्यवंशी यांनी रितसर नोटीस पाठवली असुन ही समस्या लवकर सोडविण्यासाठी प्रयत्न करावे अशी विनंती केली आहे.

## ‘थप्पड प्रकरणा’चा वाद पुन्हा पेटला!

**नवी दिल्ली** – २००८ मधील आयपीएल सामन्यादरम्यान किंग्ज इलेव्हन पंजाब (आताचा पंजाब किंग्स) आणि मुंबई इंडियन्स यांच्यातील सामन्यानंतर हरभजन सिंगने मैदानावरच श्रीसंतच्या कानशिलात लगावली होती. या घटनेचे भारतीय क्रिकेट वर्तुळात तीव्र पडसाद उमटले होते आणि आयपीएलच्या इतिहासातील हा अत्यंत वादग्रस्त क्षण ठरला होता. या घटनेनंतरच्या काळात दोन्ही खेळाडूंनी हा वाद मागे सोडल्याचे चित्र निर्माण झाले होते. मात्र, आता या दोन्ही माजी खेळाडूंमधील संबंध पुन्हा एकदा कमालीचे ताणले गेले आहेत. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, हरभजन सिंगच्या एका ताज्या जाहिरातीमुळे हा वाद पुन्हा उफाळून आला आहे. या जाहिरातीत हरभजनने श्रीसंतचे थेट नाव न घेता, त्या ऐतिहासिक थप्पड प्रकरणाची काहीशी खिल्ली उडवल्याचे दिसून आले. यावर तीव्र आक्षेप घेत श्रीसंतने हरभजनसोबतचे सर्व संबंध पुन्हा तोडल्याचे आणि त्याला सोशल मीडियावर ब्लॉक केल्याचे जाहीर केले आहे.

# ...तर आपल्याला ऑपरेशन कमळ करावे लागेल!

**शिवसेना वर्धापन दिनी उद्धव ठाकरे यांची गर्जना : भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्यावर हल्लाबोल केला.**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी

उद्धव ठाकरे यांच्या पक्षाचे नऊ पैकी सहा खासदार एकनाथ शिंदे यांनी गळाला लावल्यानंतर आज शिवसेनेचा हिरकमहोत्सवी वर्धापन दिन साजरा झाला. उद्धव ठाकरे यांनी यामेळाव्यात भाजपा आणि त्यांच्या धोरणावर जोरदार टीका केली. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की ज्या पद्धतीने देशाचं राजकारण सुरू आहे. ते पाहिल्यावर लोकांचं लोकशाहीवरचा विश्वास उडत चालला आहे. तुम्हाला नेमके किती आमदार खासदार हवेत असा सवाल यावेळी उद्धव ठाकरे यांनी केला आहे. एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगर सुरु केले आहे. याचा उल्लेख करीत उद्धव ठाकरे म्हणाले की आता जे दिवस आलेले आहेत. डॉक्टर लोकं प्रश्नचिन्हांकित झालं आहे. आपण करतोय काय.एक कार्टुन आल होते. एका सोने चोराला पोलिसांनी पकडलं. तो म्हणतो साहेब चोरी म्हणू नका. ऑपरेशन गोल्ड म्हणा.! असं चालू असेल तर आपल्याला ऑपरेशन कमळ करावे लागेल असा इशारा उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला. उद्धव ठाकरे म्हणाले की हा लोकशाहीला धोका आहे. असंच सुरू राहिलं तर देश अराजकाकडे चालला आहे. मी भाकीत करत नाही. मी ज्योतिष नाही. ते दिसतंय. ज्या देशात तरुणाईला झुरळ म्हटलं जातं त्या देशाचं




भविष्य काय असेल. वाटेल ते करून निवडणुका जिंकल्या जात आहे. पलिकडून कुणाला अर्ज भरूच दिला जात नाही. एवढं करून कुठे जाणार आहे. काय करणार आहात देशाचं. नड्डा म्हणाले होते देशात एकच पार्टी राहिल. यांची वाटचाल नो वन पार्टी नो इलेक्शन. भाजप दोस्त होता. प्रेमळ सल्ला देतो. या वाटेनं जाल तर दीर्घकाळ सत्ता लाभणार नाही. तरुणांना झुरळ म्हणत असाल तर मुलं पेटली तर तुमचं सरकार राहणार नाही असा इशारा उद्धव ठाकरे यांनी यावेळी दिला. दरम्यान या वर्धापन मेळाव्यात उद्धव ठाकरे यांनी भाजपा आणि एकनाथ शिंदे यांच्यावर जोरदार टीका केली. आपण बंगल्यात बसून असतो. बाहेर जाऊन फिरत नाही. उद्धव ठाकरे कोणाला भेटत नाहीत अशा होणाऱ्या टीकेवर उद्धव ठाकरे यांनी जोरदार हल्लाबोल केला. उद्धव ठाकरे यावेळी म्हणाले की भाजपकडे दोन तृतियांश बहुमत आहे. जेवढे आहेत ते सगळेच बाहेरचे आहेत. तुम्हाला राजकारणात पोरं होत नाही आमची का पळवताय ? तुमच्या वांझोटेपणावर तुम्ही इलाज करा. तुमची पोरं पळवणारी टोळी आहे. आमची पोरं पुरवणारी टोळी नाही. किती पळवणार असाही सवाल यावेळी ठाकरे यांनी केला. यावेळी उद्धव ठाकरे म्हणाले की उद्धव ठाकरे भेटत नाही. आदित्य फिरत नाही. मी भेटत नव्हतो तर गधड्या तू निवडून कसा आला. प्रत्येक लोकसभेत सहा ते दहा सभा घेतल्या तेव्हा निवडून आले. मी मंत्री केलं. आमदार केलं. खुर्ची दाखवली.हा माझा गर्व असेल. मी गर्व दाखवणार नाही. उद्धव ठाकरेंना किंमत नाही. उद्धव बाळासाहेब ठाकरेंना किमत आहे. शहरात जंगल तोड सुरू आहे. शहरात वडा पाव माहीत आहे. वट सावित्रीचा वड गेला. वड मोठा असतो. एखादा लांबून नमस्कार करतो. पारंबीला वाटतं मलाच केला. तुला नाही केला. तो खोडाला केला. मातोश्रीवर शिंतोडे उडवत आहेत. ही कोणती अवलाद आहे. शिवसेना प्रमुखांनी स्वाभिमान पेरला ही भेसळ कुठून आली असाही सवाल ठाकरे यांनी यावेळी केला.





# गणवेशाबाबत तडजोड नाही

राज्य सरकारकडून राज्यातील जिल्हापरिषदांच्या शाळांमधील विद्यार्थ्यांना दरवर्षी गणवेशाचे जोड पुरवले जातात. त्यासाठी केंद्र आणि राज्य सरकार चे मिळून अनुदान असते. मात्र,अशा प्रकारच्या शालेय गणवेशासाठी काही पुरवठादार कमी दर्जाच्या कापडाचा वापर करत असल्याच्या तक्रारीआल्या होत्या. म्हणूनच आता प्रत्येक शाळांमधील गणवेशाच्या कपड्यांचा दर्जा तपासण्याचानिर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. याच अनुषन्गाने राज्याचे शालेय शिक्षण मंत्री श्री . दादा भुसे यांच्याशी साप्ताहिक संवाद.

**१ राज्यातील शालेय विद्यार्थ्यांच्या गणवेशाचा दर्जा तपासला जाणार आहे त्याबद्दल?**

हो यंदा हा निर्णय राज्याच्या शालेय शिक्षण विभागाने जाणीवपूर्वक घेतलेला आहे. राज्यातील १६ लाख विदयार्थ्यांना शालेय शिक्षण विभागातर्फे दरवर्षी गणवेशाचे जोड पुरवले जातात. यासाठी प्रति गणवेश दर३०० रुपये ठरविण्यात आलेला आहे. यापैकी ४० टक्के रक्कम केंद्र सरकार तर ६० टक्के रक्क्म राज्यसरकारच्या वतीने अदा केली जाते. मात्र विद्यर्थ्यांना पुरविण्यात येणाऱ्या या गणवेशाच्या दर्जाबाबततक्रारी आल्याने या गणवेशाचा दर्जा तपासण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे.

**२ शालेय गणवेशाबाबत नेमक्या काय तक्रारी आहेत?**

शालेय गणवेशासाठी केंद्र आणि राज्य सरकार ३०० रुपये प्रति गणवेश अनुदान देत असताना काही पुरवठादार मात्र २०० रुपयात गणवेश शिवत आहेत. याचाच अर्थ ते गणवेशासाठी हलक्या दर्जाचा कापड वापरत आहेत असे आढळले आहे. हलक्या दर्जाच्या कापडामुळे विद्यर्थ्यांना गरम होते. त्यामुळे हे गणवेश अधिक आरामदायी आणि विद्यार्थ्यांच्या सोईचे नाहीत. म्हणूनच राज्यातील प्रत्येक शाळांमध्ये जाऊन अधिकारी गणवेशाचा दर्जा तपासून अहवाल देणार आहेत.

**३ गणवेशासाठी हलक्या दर्जाचे कापड वापरल्यास काय कारवाई केली जाणार आहे?**

जून महिन्यात आता राज्यातील शाळा सुरु झाल्यानंतर शिक्षण आयुक्तांच्या नेत्तृत्वाखाली प्रत्येकजिल्ह्यातील केंद्र प्रमुख,पोलीस अधीक्षक,जिल्हाधिकारी याना शाळेत जाऊन गणवेश तपासणीचे आदेशदेण्यात आलेले आहेत. तसेच जिल्हयातील शिक्षणाधिकारी देखील आपल्या जिल्ह्यांच्या शाळांमधीलविद्यार्थ्यांच्या गणवेशाचा दर्जा तापसणार आहेत. या तपासणीत एखाद्या पुरवठादाराने हलक्या प्रतीचेकापड गणवेशासाठी वापरल्याचे आढळल्यास त्याच्यावर थेट कारवाई केली जाणार असून त्याचे कंत्राट देखील रद्द केले जाईल.




संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल - subodh.ranshevre@rediffmail.com

# नवीन लिस्टिंगमुळे इन्विट्स बाजारपेठ अधिक विस्तारली

भारतातील इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट्सनी (इन्विट्स) आर्थिक वर्ष २०२६ च्या चौथ्या तिमाहीत अंदाजे ५.५८ लाख युनिटधारकांना एकत्रितपणे ७,७१९ कोटी रूपये वितरित करून भारतामधील गुंतवणूक क्षेत्रात आपले स्थान अधिक दृढ केले आहे. हे वितरण आर्थिक वर्ष २०२६ च्या तिसऱ्या तिमाहीतील ५,७४४ कोटी रूपयांच्या वितरणापेक्षा तिमाही-दर-तिमाही ३४टक्के वाढ दर्शवते. यावरून या क्षेत्राची सातत्यपूर्ण वाढ आणि गुंतवणूकदारांना स्थिर रोख प्रवाह देण्याची वाढती क्षमता दिसून येते.आर्थिक वर्ष २०२६ दरम्यान, इन्विट्सनी २२,७६९ कोटी रूपये वितरित केले, ज्यामुळे त्यांच्या स्थापनेपासूनचे एकूण संचित वितरण ९१,००० कोटी रूपयांवर पोहोचले आहे.या उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील मालमत्तेत (एयूएम) निरंतर वाढहोत आहे, जी आर्थिक वर्ष २०२५ मधील ६.३ लाख कोटी रूपयांवरून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ७.१ लाख कोटी रूपये झाली आहे. इन्विट्स उद्योगाचे बाजार भांडवल आर्थिक वर्ष २०२५ मधील २.२० लाख कोटी रूपयांवरून वाढून आर्थिक वर्ष २०२६ मध्ये २.९२ लाख कोटी रूपये झाले आहे. यामध्ये वार्षिक आधारावर साधारणपणे ३२ टक्के वाढ दिसून येते, तसेच भारतातील भांडवली बाजारामध्ये या मालमत्ता वर्गाचे वाढते महत्त्व आणि व्याप्ती अधोरेखित करते.या वर्षभरात इन्विट्सच्या परिसंस्थेमध्ये लक्षणीय विस्तार पाहायला मिळाला. यादरम्यान ३ नवीन इन्विट्स सूचीबद्ध झाले, ज्यामुळे आर्थिक वर्ष २०२६ मध्ये एकूण सूचीबद्ध इन्विट्सची संख्या२५ वर पोहोचली आहे.

# चंद्रपूरचे महाकाली मंदिर

महाकाली मंदिर हे चंद्रपूर मधील एक प्रमुख मंदिर आहे, आणि अनेक भाविक मंदिरात दररोजविशेषतः मंगळवारी जातात. हे मंदिर म्हणजे शहरातील एक मानाचे चिन्ह म्हटले जाऊ शकते.चंद्रपूरवाशी लोकांच्या हृदयात याला महत्त्वाचे स्थान आहे. या मंदिरात मुख्य देवता महाकालीमाता आहे. सामान्यतः एप्रिल महिन्यात यात्रेकरूंची गर्दी होते, विशेषतः हनुमान जयंतीच्यापूर्वसंध्येला एप्रिल महिन्यामध्ये आयोजित वार्षिक महोत्सवात लाखो लोक या प्रसंगी मंदिराकडे झुंडीने येतात. भाविकांना दर्शनासाठी मंदिराबाहेर रांगेत लागावे लागते.महाकाली मंदिरात दोन मूर्ति आहेत. एक उभी मूर्ति म्हणजे



लाल, पिवळा आणि नारंगी रंगाचे कापड असलेली मुख्य मूर्ती. मुख्य मूर्ती शिवलिंगशीदेखील आहे. दुसरी मूर्ती मूळ जागेच्या खाली आहे आणि तिथे पोहोचण्यासाठी, एक विशिष्ट प्रकारचे सुरंगामधून चालणे आवश्यक आहे .पिण्याचे पाणी, निवास आणि प्रसाद वितरण सर्व सुविधा मंदिर परिसरात उपलब्ध आहेत. मंगळवार हा या मंदिरात पूजेचा सर्वात प्रमुख दिवस मानला जातो.मंदिरात दोन दरवाजे आहेत, भगवान गणेश आणि शनि मंदिर दर्शविणारे मागील प्रवेशद्वार, जे शनिवारी पुजले जाते, आणि दुसरा भगवान हनुमान दर्शवितो. दोन्ही प्रवेशद्वारांमध्ये नारळ, फुले व कापड यासारख्या पूजासाधनांसाठी लहान दुकाने आहेत.

# शिवार रस्ता खुला करण्यासाठी तहसीलदारांना निवेदन

**भद्रावतीतील वाहतूक कोंडीवर उपाय : नगर परिषद अध्यक्ष प्रफुल चटकी यांचा पुढाकार**

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भद्रावती** प्रतिनिधी

शहरातील वाढत्या वाहतूक कोंडीच्या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी नगर परिषद भद्रावतीचे अध्यक्ष प्रफुल चटकी यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार भद्रावती यांना निवेदन सादर करण्यात आले. मोझा-भद्रावती, चिचोर्डी व केमुर्ली शिवारातील रामटेके रॉयल डेपो ते कोल्हटकर यांचे शेत, तेथून बालाजी वॉटर पार्क मार्गे केमुर्ली रस्त्यापर्यंतचा ८० फूट रुंदीचा शिवार रस्ता मोकळा करून वाहतुकीसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी यावेळी करण्यात आली.

निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, सदर शिवार रस्ता सध्या वापरात नसल्याने केमुर्ली व चिचोर्डीकडे जाणारी जड वाहने





भद्रावती शहरातूनच मार्गक्रमण करतात. त्यामुळे मुख्य बाजारपेठ, मेडिकल चौक, मेन मार्केट, बसस्थानक परिसर आणि इतर प्रमुख मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. हा शिवार रस्ता वाहतुकीसाठी खुला झाल्यास शहरातील वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होऊन नागरिकांना दिलासा मिळणार आहे.

तसेच चंद्रपूर-नागपूर महामार्गावरील मानोरा फाटा परिसरातून येणाऱ्या जड वाहनांसाठी हा पर्यायी मार्ग उपलब्ध झाल्यास शहरातील मुख्य रस्त्यांवरील गर्दी कमी होऊन वाहतूक सुरळीत होण्यास मदत होईल, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. यावेळी नगर परिषद अध्यक्ष प्रफुल चटकी, विविध नगरसेवक, तसेच अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते. तहसीलदारांनी निवेदन स्वीकारून प्रकरणाची योग्य ती दखल घेण्याचे आश्वासन दिल्याची माहिती देण्यात आली.

# स्क्वॅश स्पर्धेसाठी जिल्हा संघाची २१ जून रोजी निवड चाचणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

द महाराष्ट्र स्क्वॅश रॅकेट्स असोसिएशन यांच्या मान्यतेने राज्यस्तरीय आंतरजिल्हा स्क्वॅश चॅम्पियनशिप २०२६ चे आयोजन दिनांक १ ते ६ जुलै २०२६ या कालावधीत महाराष्ट्र स्क्वॅश अकॅडमी, एन.आय.बी.एम. रोड, उंड्री, पुणे येथे करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी जळगाव जिल्हा संघाची निवड करण्याकरिता जळगाव जिल्हा हौशी स्क्वॅश असोसिएशन व एकलव्य क्रीडा संकुल, जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, दिनांक २१ जून २०२६ रोजी सकाळी १०:०० वाजता सर्व वयोगटाकरिता निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. या निवड चाचणीत उत्कृष्ट कामगिरी करणारे व प्राविण्यप्राप्त खेळाडूंची राज्यस्तरीय आंतरजिल्हा स्क्वॅश चॅम्पियनशिपसाठी जळगाव जिल्हा संघात निवड करण्यात येणार आहे. सदर स्पर्धा मुले व मुलींसाठी अनुक्रमे ११ वर्षांखालील, १३ वर्षांखालील, १५ वर्षांखालील, १७ वर्षांखालील, १९ वर्षांखालील, तसेच पुरुष व महिला खुला गट, ३५ वर्षांवरील आणि ४५ वर्षांवरील गटांमध्ये होणार आहे. जिल्ह्यातील सर्व स्क्वॉश खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी होऊन राज्यस्तरीय स्पर्धेत जळगाव जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळवावी, असे आवाहन जळगाव जिल्हा हौशी स्क्वॅश असोसिएशनचे अध्यक्ष यांनी केले आहे. निवड चाचणी व नोंदणीसंदर्भातील अधिक माहितीसाठी इच्छुक खेळाडूंनी जळगाव जिल्हा हौशी स्क्वॅश असोसिएशनचे अध्यक्ष श्री. हर्षल चौधरी (९८९०९२३४०५), सचिव डॉ. श्रीकृष्ण बेलोरकर (९८६०२६५३७३), सहसचिव डॉ. रणजीत पाटील (८६००८३९१२६) यांचेशी तसेच एकलव्य स्कॉश अकॅडमी, क्रीडा संकुल, जळगाव येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# महाराष्ट्र ग्रॅपलिंग संस्थेची जिल्हा कार्यकारिणी जाहीर

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**वरणगाव** प्रतिनिधी

राज्यस्तरीय अधिकृत ग्रॅपलिंग (मल्लयुद्ध) संस्थेच्या जिल्हा कार्यकारिणीची निवड नुकतीच नाशिक येथे संपन्न झाली. राज्य ग्रॅपलिंग संस्थेच्या अध्यक्षा अर्चना देशमुख आणि राज्य सचिव संतोष देशमुख यांनी या कार्यकारिणीची घोषणा केली. सदर संस्थेच्या अध्यक्षपदी वरणगाव येथील सेवानिवृत्त सैनिक पैलवान संजय बावस्कर यांची निवड करण्यात आली आहे. तसेच उपाध्यक्षपदी पैलवान उत्तम भोई, सचिवपदी पैलवान दिलीप संगेले, सहसचिवपदी बाळासाहेब चव्हाण, कोषाध्यक्षपदी प्रणय बावस्कर यांची निवड झाली आहे. सदस्य म्हणून महेंद्र इंगळे, सतीश मोरे, राजकिरण निकम, जितेंद्र मोरे आदींची निवड जाहीर करण्यात आली. या संस्थेतर्फे दि. ११ व १२ जुलै २०२६ रोजी ईश्म स्पोर्ट्स अँड फिटनेस क्लब, विभागीय क्रीडा संकुल, पंचवटी, नाशिक येथे पंचपरीक्षा व प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. या सेमिनारमध्ये शालेय, जिल्हा, विभागीय व राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये अधिकृत रेफरी म्हणून काम करण्याची संधी मिळणार आहे. तसेच राज्य संघटनेच्या अधिकृत स्पर्धा व टेक्निकल कमिटीमध्ये सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणार आहे. याशिवाय राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कोर्ससाठी पात्रता प्राप्त करण्याची संधी मिळणार असून अनुभवी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पंचांचे मार्गदर्शनही लाभणार आहे. या प्रशिक्षण शिबिरात डब्ल्यूडब्ल्यू ग्रॅपलिंगचे अद्ययावत नियम व नियमन, तसेच ग्रॅपलिंग (मल्लयुद्ध) खेळाची सखोल माहिती प्रात्यक्षिकांसह दिली जाणार आहे. त्यानंतर लेखी व तोंडी परीक्षा घेण्यात येणार आहे. या शिबिरात सर्व खेळांतील वरिष्ठ खेळाडू, क्रीडा शिक्षक, प्रशिक्षक, कोच, ट्रेनर तसेच ग्रॅपलिंग व मल्लयुद्ध खेळात रुची असलेल्या महिला व पुरुषांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. सहभागी उमेदवारांना राज्यस्तरीय रेफरी डिप्लोमा प्रमाणपत्र, राज्यस्तरीय रेफरी लायसन्स तसेच अधिकृत राज्यस्तरीय रेफरी टी-शर्ट प्रदान करण्यात येणार आहे.

## आंतरराष्ट्रीय योग दिन विशेष

# निरोगी वार्धक्यासाठी योग!

आजच्या आंतरराष्ट्रीय योग दिनाची थीम आहे ''निरोगी वार्धक्यासाठी योग'' सर्वप्रथम, आपण स्वतःला एक प्रश्न विचारूया... आपल्याला फक्त जास्त वर्षे जगायचे आहे का, की निरोगी, आनंदी आणि स्वावलंबी आयुष्य जगायचे आहे? कारण दीर्घायुष्य आणि निरोगी आयुष्य यात फरक आहे. वय वाढणे ही निसर्गाची प्रक्रिया आहे. पण वय वाढताना शरीर अशक्त होणे, सांधे दुखणे, स्मरणशक्ती कमी होणे, झोप न लागणे, सतत औषधांवर अवलंबून राहणे हे आवश्यक नाही. योग आपल्याला केवळ दीर्घायुष्य नाही तर ''आरोग्यपूर्ण दीर्घायुष्य'' देण्यास मदत करतो. हेल्दी एजिंग म्हणजे काय हे पाहुया..

**हेल्दी एजिंग म्हणजे**

- शरीर सक्षम असणे
- मन प्रसन्न असणे
- स्मरणशक्ती व एकाग्रता चांगली असणे
- स्वतःची कामे स्वतः करता येणे
- जीवनाकडे सकारात्मक दृष्टिकोन ठेवणे

आयुर्वेदात यालाच ''स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम्'' असे म्हटले आहे.

आपल्याकडे वय वर्षे ५८ साधारण किंवा ६० हे रिटायरमेंटचे वय आहे. आणि एकदा का रिटायरमेंट झाली की सगळ्यांना असे वाटते की आता आपण म्हातारे झालेले आहोत आणि आता आपल्याकडून काही कामे होणार नाहीयेत आणि मनानेच लोक म्हातारे असल्यासारखे वागू लागतात. परदेशात मात्र वय वर्ष ८० असलेले लोकही स्वतःला अत्यंत फिट समजतात किंबहुना ते फिट असतात साठ वयाच्या पुढचे लोकही सायकलिंग ट्रेकिंग स्विमिंग जिम



मधले व्यायाम प्रकार आणि अनेक गोष्टी करत असतात तसेच स्वतःचे कामेही स्वतः करतात आपल्याकडे नेमकी याच्या उलट परिस्थिती आहे स्वतःला फिट कसे ठेवावे हे आपल्याला योगशास्त्राच्या मदतीने समजते. आयुर्वेद आणि योग हे एकमेकांच्या हातात हात घालून काम करत असतात त्यामुळे या दोघांचा उपयोग आपल्या रोजच्या जीवनात केला तर त्याचा निश्चितच छान फायदा दिसून येतो व आपण आपली वृद्धावस्था ही उत्तम ठेवू शकतो . निसर्ग नियमाप्रमाणे प्रत्येक व्यक्ती ही वृद्ध अवस्थेत जाणारच आहे परंतु हे म्हातारपण सुद्धा कसे आनंदात व स्वावलंबी करू शकतो हे पाहुया..

**आजच्या काळात वार्धक्याची आव्हाने**

आजच्या बदललेल्या जीवनशैलीमुळे अनेक समस्या लवकर दिसू लागल्या आहेत.

- मधुमेह
- उच्च रक्तदाब
- स्थूलता
- सांधेदुखी
- पाठदुखी
- निद्रानाश
- ताणतणाव
- नैराश्य

या सर्वांचा परिणाम वृद्धत्वाच्या प्रक्रियेवर होतो. म्हणूनच आज योगाची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे.

**योग म्हणजे नेमके काय?**

अनेकांना वाटते योग म्हणजे फक्त आसने. परंतु योग हा शरीर, मन आणि आत्मा यांचा समतोल साधणारा जीवनमार्ग आहे. पतंजलींनी योगाची व्याख्या केली आहे ''योगश्चित्तवृत्ती निरोधः'' म्हणजे मनातील चंचलतेवर नियंत्रण मिळविण्याची प्रक्रिया म्हणजे योग.

**निरोगी वार्धक्यासाठी योगाचे फायदे**

१)शरीर लवचिक ठेवतो
नियमित योगाभ्यासामुळे स्नायू मजबूत होतात
- सांधे लवचिक राहतात
- शरीराचा तोल सुधारतो

यामुळे पडण्याचा धोका कमी होतो.

२. हृदयाचे आरोग्य सुधारते
- रक्तदाब नियंत्रित राहतो
- रक्ताभिसरण सुधारते
- हृदयावरील ताण कमी होतो

३. मानसिक आरोग्य सुधारते
प्राणायाम आणि ध्यानामुळे
- ताण कमी होतो
- चिंता कमी होते
- मन शांत राहते
- सकारात्मकता वाढते
- आत्मविश्वास वाढतो

४. स्मरणशक्ती आणि एकाग्रता वाढते
नियमित ध्यान केल्याने मेंदूची कार्यक्षमता सुधारते.
वृद्धापकाळातील विस्मरणाचा वेग कमी होण्यास मदत होते.

५. झोप चांगली लागते
योग आणि श्वसनक्रिया शरीराला विश्रांती देतात. त्यामुळे नैसर्गिक झोप सुधारते.

हेल्दी एजिंगसाठी उपयुक्त योगाभ्यास आसने
- ताडासन
- वृक्षासन
- त्रिकोणासन
- भुजंगासन
- वज्रासन
- पवनमुक्तासन
- ज्यांना शक्य आहे त्यांच्यासाठी सूर्यनमस्कार

वय आणि क्षमतेनुसार आसनांचा सराव करावा.

प्राणायाम
- अनुलोम-विलोम
- भ्रामरी
- उज्जायी
- दीर्घ श्वसन

प्राणायामामुळे शरीरात प्राणशक्तीचा प्रवाह सुधारतो.

ध्यान
दररोज १० ते १५ मिनिटे ध्यान केल्यास
- मानसिक शांतता
- भावनिक संतुलन
- अंतर्मनाची स्थिरता मिळण्यास मदत होते.

आयुर्वेद आणि योग
आयुर्वेद सांगतो की वार्धक्य ही वातप्रधान अवस्था आहे.
वाढलेला वात- कोरडेपण, वेदना,थकवा,अस्थिरता निर्माण करू शकतो. योग, प्राणायाम, ध्यान, योग्य आहार आणि दिनचर्या यांच्या साहाय्याने वात संतुलित ठेवता येतो. म्हणून आयुर्वेद आणि योग हे एकमेकांचे पूरक आहेत.

**जीवनासाठी काही सोपे मंत्र**

- दररोज किमान ३० मिनिटे योग
- नियमित चालणे
- संतुलित आहार
- पुरेशी झोप
- सकारात्मक विचार
- ताणमुक्त जीवनशैली

योग आपल्याला वृद्धत्व थांबवायला शिकवत नाही, परंतु वृद्धत्वाला सुंदर, सन्माननीय आणि निरोगी बनवायला शिकवतो.

चला, आपण सर्वजण आज एक संकल्प करूया.. ''वय वाढेल, पण उत्साह कमी होणार नाही. शरीर वृद्ध होईल, पण मन तरुण राहील. आणि या प्रवासात योग माझा आयुष्यभराचा साथीदार असेल.'' आपल्या सर्वांना आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या हार्दिक शुभेच्छा!



डॉ. लीना बोरुडे
आयुर्वेदाचार्य, पुणे
मो. ९५११८०२९८

दैनिक लोकशाही
जळगाव next



## नाशिक हायप्रोफाईल प्रकरणाची सुनावणी २५ तारखेला

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**नाशिक** प्रतिनिधी

नाशिकमधील बहुचर्चित टीसीएस प्रकरणातील निदा खान प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. नाशिकमधील अत्याचार, धर्मांतरण प्रकरणी निदा खान, तौसिफ अत्तार आणि दानिश शेख यांच्या जामीन अर्जावरील सुनावणी आज न्यायालयात पार पडली. या प्रकरणात न्यायालय काय निर्णय देते याकडे सर्वांचे लक्ष लागून होते. दरम्यान, न्यायालयात यापूर्वी आरोपींच्या वकिलांची बाजू ऐकून घेतल्यानंतर आज न्यायालयाने सरकारी पक्षाचा युक्तिवाद आणि बाजू ऐकून घेतली. दोन्ही बाजूंचं म्हणणे ऐकल्यानंतर न्यायालयाने आपला निकाल तूर्तास राखून ठेवला आहे. या हायप्रोफाईल प्रकरणाची पुढील सुनावणी आता २५ तारखेला होणार आहे. तोपर्यंत आरोपींचा मुक्काम तुरुंगातच राहणार असून २५ जूनला निदा खान आणि इतर दोघांबाबत पुन्हा न्यायालयात सुनावणी होईल.

## महत्वाचे



### कोमल शर्मा हिचे सी.ए. परीक्षेत यश

**जळगाव–** येथे कोमल शर्मा या विद्यार्थिनीने वयाच्या २१ व्या वर्षी चार्टर्ड अकाउंटंट परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात तीनही लेव्हलमध्ये उत्तम गुण संपादन करीत घवघवीत यश मिळविले आहे. जैन इरिगेशनचे वरिष्ठ अधिकारी तनुज शर्मा यांची ती सुकन्या आहे.

### विहिरीत पडून शेतकऱ्याचा मृत्यू

**धरणगाव –** तालुक्यातील पष्टाणे बुद्रुक येथील ३२ वर्षीय युवकाचा शेतातील विहिरीत पडून बुडाल्याने मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. याप्रकरणी धरणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सागर संतोष पाटील (वय ३२, रा. पष्टाणे बुद्रुक, ता. धरणगाव) हे त्यांच्या मालकीच्या शेतात गेले होते. दरम्यान, शेतातील विहिरीत पडल्याने पाण्यात बुडून त्यांचा मृत्यू झाला. घटनेनंतर त्यांना तातडीने धरणगाव ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले. मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी तपासणीअंती त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती मिळाल्यानंतर धरणगाव पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यू दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास पोलीस करीत आहेत.

### बोदवड तालुक्यात तरुणाची गळफास

**बोदवड –** तालुक्यातील फरकांडे मारुती येथील ३० वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची दुर्दैवी घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी बोदवड पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, जवानसिंग गुलाब बारेला (वय ३०, रा. फरकांडे मारुती, ता. बोदवड) यांनी त्यांच्या राहत्या घरात गळफास घेतला. ही बाब कुटुंबीयांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांना खाली उतरविण्यात आले; मात्र त्यांचा मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी भेट देऊन पंचनामा केला. याप्रकरणी अकस्मात मृत्यू क्रमांक २७/२०२६ नुसार नोंद करण्यात आली असून आत्महत्येमागील कारणांचा शोध घेण्यासाठी पुढील तपास सुरू आहे.

# सुप्रीम कॉलनी प्लास्टिक स्क्रॅपला भीषण आग

## अग्निशमन दलाच्या तत्परतेने मोठा अनर्थ टळला : पाच बंबांच्या मदतीने आगीवर नियंत्रण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी





शहरातील सुप्रीम कॉलनी परिसरात निलांबरी हॉटेलच्या मागील बाजूस असलेल्या मुस्कान प्लास्टिक भंगार गोदामातील प्लास्टिक स्क्रॅपला शुक्रवारी दुपारी सुमारे ३ वाजेच्या सुमारास आग लागल्याची घटना घडली. आगीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणावर धुराचे लोट पसरले होते. घटनास्थळी असलेल्या विद्युत डीपीमधून पडलेल्या चिंगारीमुळे आग लागली असावी, असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत आहे. प्लास्टिक स्क्रॅप असल्याने आग वेगाने पसरत होती आणि मोठ्या प्रमाणावर धूर निर्माण होत असल्याने आग विझविण्यात अडचणी येत होत्या. घटनेची माहिती मिळताच एमआयडीसी अग्निशमन केंद्र, गोलाणी फायर स्टेशनच्या दोन गाड्या, महाबळ फायर स्टेशन आणि शिवाजीनगर फायर स्टेशनच्या गाड्या अशा एकूण पाच अग्निशमन बंबांनी घटनास्थळी धाव घेतली. अग्निशमन दलाच्या कर्मचाऱ्यांनी तातडीने पाण्याचा मारा करत आगीवर नियंत्रण मिळविले. आग वेळीच आटोक्यात आणल्यामुळे आसपासच्या परिसरात ती पसरण्यापासून रोखण्यात यश आले. अन्यथा मोठ्या प्रमाणावर वित्तहानी आणि जीवितहानी होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. या आगीत अंदाजे ३ ते ४ लाख रुपयांचे नुकसान झाल्याची प्राथमिक माहिती आहे. मुख्य अग्निशमन अधिकारी अश्वजीत घरडे यांच्या मार्गदर्शनाखाली वाहन चालक युसुफ पटेल, प्रकाश चव्हाण, गोविंद माळी, मयूर देसले, प्रभाकर पाटील तसेच फायरमन संजय तायडे, योगेश पाटील, रवींद्र बोरसे, नितीन ससाने, योगेश कोल्हे, राकेश सोनवणे, सौरभ चिकटे, केतन पाटील, किरण पाटील, रुपेश पाटील, ललित पाटील, रितेश उबाळे, विनोद कोळपे, राहुल फुलपगारे, लखन माळी आदी कर्मचाऱ्यांनी अथक प्रयत्न करून आग पूर्णपणे विझवली.

## टायगर स्कूल येथे जिजाऊ व महाराणा प्रताप जयंती



**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पारोळा** प्रतिनिधी

येथील टायगर इंटरनॅशनल स्कूल, येथे दिनांक १७ जून रोजी राजमाता जिजाऊ जयंती, महाराणा प्रताप जयंती तसेच वीरांगना झाशीच्या राणी लक्ष्मीबाई यांच्या स्मृतिदिनानिमित्त विशेष अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना राजमाता जिजाऊ यांनी शिवरायांना दिलेले संस्कार, स्वराज्यनिर्मितीतील त्यांचे योगदान, महाराणा प्रताप यांचे अद्वितीय शौर्य व स्वाभिमान तसेच राणी लक्ष्मीबाई यांचे राष्ट्रप्रेम, पराक्रम आणि बलिदान याविषयी माहिती देण्यात आली. विद्यार्थ्यांनी भाषणे, मनोगते आणि घोषवाक्यांच्या माध्यमातून या महान व्यक्तिमत्त्वांना अभिवादन केले. त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेऊन राष्ट्रप्रेम, धैर्य, स्वाभिमान, नेतृत्वगुण आणि सामाजिक बांधिलकी जोपासण्याचा संदेश देण्यात आला. या कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष रविंद्र पाटील, संचालिका रूपाली पाटील, प्राचार्य पी. एस. पाटील, प्री प्रायमरी प्राचार्य अजीम शेख, उपप्राचार्या कविता सूर्यवंशी, स्कूल समन्वयक नम्रता बेडीस्कर, विभागप्रमुख वृषाली पाटील व काजल सिंधी, लिपिक श्रीकांत खैरनार तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी महापुरुषांच्या विचारांचे आचरण करण्याचा संकल्प करून त्यांना विनम्र अभिवादन केले.

## खेडगाव जिल्हा परिषद शाळेत जपानी भाषा

### रोटरी क्लब पाचोरा भडगाव सदस्यांनी केले कौतुक

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**पाचोरा** प्रतिनिधी



रोटरी क्लब पाचोरा - भडगाव नेहमीच नावीन्य पुर्ण कार्यक्रम घेत असतात. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद शाळा खेडगाव (नंदीचे) येथे शालेय विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबीर अंतर्गत डॉ. प्रशांत सांगडे यांनी दैनंदिन जीवनातील चांगल्या सवयी, ज्ञानेश्वर पाचोळे यांनी विद्यार्थ्यांना सकस आहार यावर मार्गदर्शन केले. रोटरी अध्यक्ष डॉ. मुकेश तेली यांनी विद्यार्थ्यांना अभ्यासात जिद्द आणि सातत्य यावर मार्गदर्शन केले. यावेळी रोटरी सदस्य मनोज केसवानी आणि डॉ. प्रशांत सांगडे यांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहनपर बक्षिसे देऊन गौरव केला. कार्यक्रमाच्या शेवटी रोटरी क्लब पाचोरा - भडगाव यांचेकडून विद्यार्थ्यांना अल्पोपहार देण्यात आला. यावेळी अतिरिक्त अभ्यास म्हणून जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांचे जपानी भाषेचे वर्ग सुरु होते. अशा या अनोख्या उपक्रमाचे रोटरी क्लब पाचोरा - भडगाव कडून कौतुक करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक पाटील, उज्वला वाडेकर, जपानी भाषा शिक्षक बोरसे यांचे देखील कौतुक करण्यात आले. यावेळी रोटरी क्लब पाचोरा - भडगाव अध्यक्ष डॉ. मुकेश तेली, रोटरी सदस्य भरत सिनकर, डॉ. प्रशांत सांगडे, डॉ. सिद्धांत तेली, ज्ञानेश्वर पाचोळे केंद्र प्रमुख, उद्योजक मनोज केसवानी, लक्ष्मण जाधव आदी उपस्थित होते.

## भेळ विक्रेत्याची लेक झाली चार्टर्ड अकाउंटंट

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी



परिस्थितीवर जिद्दीने मात करत अमळनेरच्या प्रिया बाबुलाल तेली यांनी भारतातील सर्वात कठीण समजल्या जाणाऱ्या चार्टर्ड अकाउंटंट्स परीक्षेत यश संपादन केले आहे. मोठी स्वप्ने पाहण्यासाठी श्रीमंत घराण्यात जन्म घेण्याची गरज नसते, हे प्रियाने आपल्या कर्तृत्वातून सिद्ध करून दाखवले आहे. प्रिया ही लक्ष्मी भेळ सेंटरचे मालक बाबुलाल शिवराम तेली यांची कन्या आहे. बाबुलाल तेली अनेक वर्षापासून आपल्या लोडगाडीवर भेळपुरी, कचोरी व इतर खाद्यपदार्थ विकून प्रामाणिकपणे आपल्या कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. ऐश्वर्य देता आले नाही, तरी त्यांनी आपल्या मुलींना कष्ट, संस्कार आणि शिक्षणामुळे आयुष्य बदलू शकते या अढळ विश्वासाची शिदोरी भरभरून दिली. प्रियाने आपले माध्यमिक शिक्षण डी. आर. कन्याशाळा, अमळनेर येथे पूर्ण केले आणि त्यानंतर प्रसिद्ध प्रताप महाविद्यालय, अमळनेर येथे शिक्षण घेतले. मोठ्या शहरांतील नामांकित क्लासेसपासून दूर राहूनही तिने आपल्या गावातच राहून देशातील एका अत्यंत कठीण व्यावसायिक पात्रतेपर्यंत मजल मारली. तिच्या यशाचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

## व्यंकटेश महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे घवघवीत यश



Ayesha Parveen Feroz (80.09%) Math Group (Rank I)
Rafiya Anam Shaikh Jabbar (74.83%) Math Group (Rank II)
Zishan Javed Khan (73.49%) Math Group (III Rank)

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**देऊळगाव राजा** प्रतिनिधी

श्री व्यंकटेश कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयाच्या विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांनी उन्हाळी २०२६ परीक्षेत घवघवीत यश मिळवले असून एकूण ९१.८६% निकाल लागला आहे. बी. एस्सी. तृतीय वर्षामध्ये एकूण १२३ विद्यार्थी परीक्षेला बसले होते त्यापैकी ११३ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. ८३ विद्यार्थी प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले असून यामध्ये १७ विद्यार्थी प्राविण्य श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाले आहेत. बायो ग्रुपमध्ये पायल सतीश म्हस्के या विद्यार्थिनीने ७८.०५ % मिळवून प्रथम, पायल बद्रिनारायन मांटे हीने ७४.५० % गुण मिळवून द्वितीय व आकाक्षा सुरेश उकरडे हिने ७३.९४ % गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. मॅथ ग्रुप मध्ये आयेशा परवीन फेरोज शेख हिने ८०.०९ % गुण मिळवून प्रथम, राफिया जब्बार शेख हिने ७४.८३ % गुण मिळवून द्वितीय व जिशान जावेद खान याने ७३.४९ % गुण मिळवून तृतीय क्रमांक पटकावला. विद्यार्थ्यांच्या या नेत्रदीपक यशाबद्दल महाविद्यालयाचे अध्यक्ष राजे विजयसिंह जाधव, व्यवस्थापन प्रतिनिधी राणीसाहेब सौ. छायाराजे विजयसिंह जाधव, प्राचार्य डॉ. ज्ञानेश्वर गोरे यांनी विज्ञान शाखेतील विद्यार्थी, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

## शेतकी संघाच्या प्रेसिडेंटपदी संभाजी पाटील

### व्हाइस प्रेसिडेंटपदी गणेश भामरे बिनविरोध : राष्ट्रवादी पक्षात प्रवेश

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**अमळनेर** प्रतिनिधी



येथील तालुका शेतकी संघाच्या प्रेसिडेंटपदी संभाजी लोटन पाटील (लोण) तर व्हाइस प्रेसिडेंट पदी गणेश धर्मराज भामरे (बाम्हणे) यांची बिनविरोध निवड करण्यात आली. माजी मंत्री तथा आमदार अनिल पाटील यांच्या मार्गदर्शनाने संचालक मंडळाने दोघांची निवड केली. अमळनेर तालुका शेतकरी संघाच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस प्रणित सहकार पॅनल चे १०, काँग्रेस प्रणित शेतकरी पॅनल चे ३, तर भाजप प्रणित किसान विकास पॅनल चे २ संचालक निवडून आले होते. आमदार अनिल पाटील यांनी शेतकी संघावर एकहाती वर्चस्व मिळविल्याने सत्तेची सर्व सूत्र त्यांच्या हातात होती. प्रेसिडेंट व व्हाइस प्रेसिडेंट पदाच्या निवडणुकीची प्रकिया १९ रोजी सकाळी ११ वाजता शेतकी संघाच्या कार्यालयात पार पडली. यावेळी सहकार पॅनलचे संचालक संजय पाटील, सचिन पाटील, विक्रांत पाटील, नितीन पाटील, रणजीत पाटील, शंकर बैसाने, सुषमा देसले, मालुबाई पाटील, शेतकरी पॅनलचे सुरेश पाटील, प्रा. शाम पवार तर किसान विकास पॅनलचे जितेंद्र पाटील व प्रफुल पवार उपस्थित होते. निर्धारित वेळेत सत्ताधारी गटातील फक्त दोघांचे फॉर्म प्राप्त झाल्याने त्यांची बिनविरोध निवड करण्यात आली. निवडणूक अधिकारी म्हणून धर्मराज पाटील तर सहाय्यक अधिकारी सुनील महाजन यांनी कामकाज पाहिले. यावेळी तालुकाध्यक्ष भागवत पाटील यांनी प्रस्ताविक केले तर नवनिर्वाचित व्हाइस प्रेसिडेंट गणेश भामरे यांनी आभार मानले. कार्यक्रमाला माजी जि. प. सदस्या जयश्री पाटील, बाजार समितीचे सभापती अशोक पाटील, तिलोत्तमा पाटील, शहराध्यक्ष चेतन राजपूत तसेच पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. दरम्यान नवनिर्वाचित प्रेसिडेंट संभाजी पाटील हे जरी सहकार पॅनल मधून निवडून आले असले तरी ते काँग्रेस पक्षात होते मात्र प्रेसिडेंट निवडणुकीच्या आधीच संभाजी पाटील यांनी आमदार अनिल पाटील यांच्या उपस्थितीत राष्ट्रवादी पक्षात प्रवेश केला, त्यामुळे पक्षाची देखील ताकद वाढली आहे.

## वाढत्या उष्णतेमुळे शाळांच्या वेळेत बदल करा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुक्ताईनगर** प्रतिनिधी

जळगाव जिल्ह्यासह राज्यातील विविध भागांमध्ये सध्या उष्णतेची तीव्र लाट कायम असून जून महिन्याच्या मध्यावरही समाधानकारक पाऊस झालेला नाही. त्यामुळे तापमानात सातत्याने वाढ होत असून नागरिकांसह शालेय विद्यार्थ्यांनाही त्याचा मोठा फटका बसत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याची व सुरक्षिततेची काळजी लक्षात घेऊन जिल्ह्यातील प्राथमिक व माध्यमिक शाळांच्या वेळेत तात्पुरता बदल करून त्या सकाळच्या सत्रात भरविण्याची मागणी आमदार चंद्रकांत पाटील यांनी केली आहे. यासंदर्भात त्यांनी जळगाव जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्ह्याचे पालकमंत्री आणि राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांना निवेदन सादर करून तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली आहे. सध्या अनेक विद्यार्थी पायी किंवा सायकलने शाळेत ये-जा करतात. प्रखर उन्हामुळे त्यांना उष्माघात, निर्जलीकरण, चक्कर येणे व अशक्तपणा यांसारख्या आरोग्यविषयक समस्यांचा सामना करावा लागू शकतो, असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. शाळांच्या वेळेत बदल करण्याबरोबरच प्रत्येक शाळेत शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, विद्यार्थ्यांसाठी सावलीची सुविधा आणि उष्णतेच्या पार्श्वभूमीवर आवश्यक प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्याच्या सूचनाही देण्यात याव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. वाढत्या तापमानामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता लक्षात घेता प्रशासनाने या मागणीची तातडीने दखल घ्यावी, अशी अपेक्षा पालक, शिक्षक आणि नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## धरण परिसरात टाकले विषारी रासायनिक पदार्थ : गुन्हा दाखल

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

धरण परिसरातील शेतजमीन व जलस्रोत प्रदूषित करून मानवी आरोग्यास धोका निर्माण केल्याप्रकरणी एका व्यक्तीविरुद्ध पहूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून पर्यावरण व सार्वजनिक आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, जामनेर तालुक्यातील तोंडापूर शिवारातील गट क्रमांक २५३/२ तसेच हालसिंगी शिवारातील गट क्रमांक ११८/२ मधील शेत परिसरात ही घटना उघडकीस आली. आरोपी शेख हसन शेख सांडू (रा. तोंडापूर, ता. जामनेर) याने काही विषारी रासायनिक पदार्थ ड्रम व प्लास्टिक बॅगमध्ये भरून परिसरात टाकल्याचा आरोप आहे. याबाबत मंडळ अधिकारी प्रशांत साहेबराव साळुंखे (वय ४२) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला. फिर्यादीनुसार, आरोपीने संबंधित रासायनिक पदार्थ परिसरात टाकल्याने ते जमिनीत व जलस्रोतांमध्ये मिसळले. त्यामुळे परिसरात तीव्र दुर्गंधी पसरून मानवी आरोग्यास धोका निर्माण झाला असून पर्यावरणाचेही नुकसान झाले आहे. या प्रकरणी पहूर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या कलम २७१, २७२, २७९, २८० व २८६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. घटनेचा पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रमोद कठोरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गणेश सुस्ते करीत आहेत.

## हिंदुत्त्वाचा हुंकार म्हणजे शिवसेना : एकनाथ शिंदे

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**मुंबई** प्रतिनिधी



शिवसेना पक्षाचा ६० वा वर्धापन दिन साजरा झाला. गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या पक्षाचा तर मुंबईच्या षण्मुखानंद सभागृहात उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचा वर्धापन दिन साजरा झाला. दरम्यान, आता शिंदे यांनी या खासदारांबाबत अप्रत्यक्षपणे मोठे विधान केले आहे. त्यांच्या या विधानानंतर भविष्यात मोठं काहीतरी घडणार असून ठाकरेंचे खासदार शिंदे गटात लवकरच सामील होतील, असा अंदाज लावला जात आहे. साठ वर्षांपूर्वी आपल्या शिवसेनेची स्थापना झाली. या हिरक मोहोत्सवानिमित्त मी सर्वांना शुभेच्छा देतो. आज समोर भगवं वादळ उठलं आहे. व्यासपीठावर बसलेले सर्व नेते, मंत्री, उपनेते, खासदार, आमदार माझे ऐश्वर्य आहे. समोर बसलेले माझे शिवसैनिक हे माझी संपत्ती आहे. बऱ्याच जणांच्या नजरा आपल्याकडे लागल्या आहेत. मी नेमकं काय बोलणार, व्यासपीठावर कोण येणार, काय होणार, याची सर्वांना उत्सुकता लागली आहे. पण आज हा वाघ तुमच्यासमोर उभा आहे, असे एकनाथ शिंदे म्हणाले. तसेच, आज मी बघतोय की काल परवापासून कुछ कुत्ते रोज भौंकं राहे है. कुत्रे झुंडीने भुंकतात. वाघ एकटाच येतो. कुभे भुंकतात टायगर शिकार करतो. आमची ही शिवसेना आहे. ही शिवसेना आज महाराष्ट्रात पाहतोय की बाळासाहेबांचे विचार, धर्मवीर आनंद दिघे यांचे विचार घेऊन आपण पुढे जात आहोत. हा फक्त ट्रेलर आहे. पिक्चर अजून बाकी आहे. पुढे पुढे बघा काय होतंय, असे सूचक विधानही शिंदे यांनी केले. पुढे बोलताना , शिवसेनाचा जन्म मराठी माणसासाठी झाला. हिंदुत्त्वाचा हुंकार म्हणजे शिवसेना, मराठीचा निर्धार म्हणजे शिवसेना, देशद्रोह्यांवर प्रहार म्हणजे शिवसेना, माझ्या लाडक्या बहिणींचा स्वाभिमान म्हणजे शिवसेना, शेतकऱ्यांचा तारणहार म्हणजे शिवसेना असल्याचे शिंदे यांनी सांगितले.

लोकशाही 'लोक'राज्य next
जळगाव, शनिवार दि.२० जून २०२६
epaper.lokshahilive.com

## किसान योजनेचा हप्ता आज जमा होणार!

**मुंबई :** पीएम किसान योजनाचा २३ वा हप्ता उद्या दि. २० जून २०२६ रोजी देशभरातील पात्र शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येणार आहे. या निमित्ताने महाराष्ट्रात २० जून हा दिवस पीएम किसान उत्सव दिवस म्हणून साजरा केला जाणार असल्याची माहिती राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. कृषी विभागाच्या वतीने राज्यभर विविध जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. गावागावांत शेतकरी मेळावे, माहिती सत्रे आणि ऑनलाइन कार्यक्रमांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना योजनेची माहिती दिली जाणार आहे. तसेच गावस्तरावर नियुक्त केलेले अधिकारी या कार्यक्रमात सहभागी होऊन लाभार्थी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. पीएम किसान योजना ही देशातील शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणारी महत्त्वाची योजना मानली जाते. या योजनेचा लाभ सुरळीतपणे मिळावा यासाठी शेतकऱ्यांनी आधार लिंक, ईकेवायसी आणि बँक खात्याशी संबंधित सर्व आवश्यक प्रक्रिया वेळेत पूर्ण करणे गरजेचे असल्याचे कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. राज्यातील प्रत्येक पात्र शेतकऱ्यापर्यंत योजनेचा लाभ पोहोचवण्यासाठी कृषी विभागाकडून विशेष प्रयत्न केले जात आहेत. अनेक शेतकऱ्यांना अद्याप काही तांत्रिक कारणांमुळे हप्ता मिळालेला नसल्याने त्यांनी आपली माहिती अद्ययावत ठेवण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

### महत्वाचे

**१०० वर्षे जुनी गोयंका धर्मशाळा जमीनदोस्त!**

**नाशिक :** आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिकमध्ये विकासकामांचा धडाका सुरु आहे. सिंहस्थ कुंभमेळा आणि राम काल पथ विकास आराखड्यांतर्गत गंगाघाट व रामकुंड परिसराचा कायापालट करण्यासाठी महापालिका प्रशासनाने अतिक्रमण निर्मूलन मोहीम तीव्र केली आहे. विविध विकासकामांमध्ये आणखी भर पडणार आहे. सिंहस्थाच्या विकासासाठी म्हणून, अनेक सिंहस्थ कुंभमेळ्यांची साक्षीदार राहिलेली आणि कपालेश्वर मंदिराजवळ असलेली सुमारे १०० वर्षे जुनी गोयंका धर्मशाळा इमारत अखेर जमीनदोस्त करण्यात आली आहे. मंगळवारी रात्री उशिरा महापालिकेच्या अतिक्रमण निर्मूलन पथकाकडून या पाडकामास सुरुवात करण्यात आली. महापालिकेने विकासासाठी ही जागा ताब्यात घेतली आहे. सोबतच येथील १३ व्यावसायिकांचे होणारे नुकसान टाळण्यासाठी येथील अनेक वर्षापासून व्यवसाय करणाऱ्या १३ व्यावसायिकांना महापालिका नव्याने गाळे बांधून देणार आहे. प्रशासनाने दिलेल्या या आश्वासनानंतर व्यावसायिकांनी देखील सकारात्मक प्रतिसाद देत स्वतःहून आपले गाळे रिकामे केले आणि शटर काढून घेतले. त्यामुळे या ठिकाणी चिंताजनक परिस्थिती निर्माण झाली नाही. व्यावसायिकांनी सहकार्य केल्यानंतर महापालिका कर्मचाऱ्यांनी प्रथम हाताने निघणारे साहित्य व पत्रे बाजूला केले.

# घरकुल योजनेतील कथित गैरव्यवहाराची चौकशी करा!

## ५९ कोटींना लावला चूना : दोषींवर कारवाईची मागणी

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी



तत्कालीन नगरपालिकेच्या ४८ नगरसेवकांनी संगनमताने घरकुल योजना राबविताना विविध नियमांचे उल्लंघन करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप करीत संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी एका निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनानुसार, नगरपालिकेने कोणताही ठराव मंजूर न करता तसेच आवश्यक प्रशासकीय व आर्थिक परवानग्या न घेता घरकुल योजना राबविली. नगरपालिकेच्या अंदाजपत्रकात योजनेसाठी कोणतीही तरतूद नसतानाही योजना राबविण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच स्थानिक निधी लेखा विभागाच्या विशेष लेखापरीक्षण अहवालासह विविध प्रशासकीय आदेशांमध्ये या योजनेतील अनियमितता अधोरेखित करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे. तत्कालीन आयुक्त डॉ. प्रविण गेडाम यांनी दि. १७ मार्च २००६ रोजी घरकुल योजनेचे बांधकाम बेकायदेशीर ठरविले होते. तसेच उपविभागीय अधिकाऱ्यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालात आरक्षित जागेवर उभारण्यात आलेली घरकुले नियमबाह्य व अनधिकृत असल्याचे नमूद असल्याचा दावा निवेदनात करण्यात आला आहे. संपूर्ण योजना बेकायदेशीर घोषित झाल्यामुळे योजनेसाठी हुडकोकडून प्राप्त झालेली सुमारे ५९ कोटी रुपयांची रक्कम वसुलीस पात्र असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या निधीच्या वापराबाबत तत्कालीन ४८ नगरसेवकांची सामूहिक जबाबदारी निश्चित करण्यात आल्याचा तसेच प्रत्येकी सुमारे १ कोटी १६ लाख रुपयांची वैयक्तिक जबाबदारी ठरल्याचा दावाही करण्यात आला आहे.

नागरिकांच्या करातून प्राप्त होणाऱ्या निधीचा गैरवापर झाल्याचा आरोप करीत या प्रकरणातील दोषींना वाचविण्याचा प्रयत्न होत असल्याची शंका व्यक्त करण्यात आली आहे. या गंभीर प्रकरणाची सखोल चौकशी करून संबंधितांवर कायदेशीर व आर्थिक जबाबदारी निश्चित करण्यात यावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

# यावल तहसील कार्यालयातील कर्मचाऱ्याची आत्महत्या

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
यावल प्रतिनिधी



यावल तहसील कार्यालयातील पुरवठा विभागात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्याने फैजपूर येथील राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना बुधवारी उघडकीस आली. या घटनेमुळे फैजपूर परिसरात खळबळ उडाली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. याप्रकरणी फैजपूर पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सागर राजेंद्र तेली (वय ३५) हे यावल तहसील कार्यालयाच्या पुरवठा विभागात कारकून म्हणून कार्यरत होते. ते फैजपूर येथील सराफ कॉलनी परिसरात वास्तव्यास होते. बुधवारी दुपारी सुमारे १२ वाजेच्या सुमारास त्यांनी आपल्या राहत्या घरातील छताच्या पंख्याच्या हुकाला सूती दोरीच्या सहाय्याने गळफास घेत आत्महत्या केली. घटनेची माहिती मिळताच परिसरातील नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली. मात्र, तोपर्यंत त्यांचा मृत्यू झाला होता. या अचानक घडलेल्या घटनेमुळे कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून परिसरात शोककळा पसरली आहे. सागर तेली यांचे नुकतेच लग्न झाले असल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नसून पोलिसांकडून विविध अंगांनी तपास सुरू आहे. या घटनेची माहिती गुणवंत दिलीप तेली यांनी फैजपूर पोलीस ठाण्यात दिल्यानंतर पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# फुकट्या प्रवाशांकडून पाच लाखांचा दंड वसूल

## ६८३ फुकटे प्रवाशी : भुसावळ विभागात रेल्वेची धडक मोहिम

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**भुसावळ** प्रतिनिधी

रेल्वेला वाढलेली गर्दी पाहता फुकट्या प्रवाशांचा उपद्रवही वाढल्याने सर्वसामान्य प्रवाशांना प्रवास करताना अडचणी येत होत्या. फुकट्या प्रवाशांना चाप बसण्यासाठी भुसावळ विभागातील आठ स्थानकावर बुधवार दि. १७ रोजी विशेष तिकीट तपासणी मोहिम राबवण्यात आली. या माध्यमातून ६८३ प्रवाशांवर कारवाई करीत चार लाख ७१ हजारांचा दंड वसुल करण्यात आला.

आठ स्थानकांवर मोहिम भुसावळसह जळगाव, नाशिक रोड, मनमाड, खंडवा, अकोला, बडनेरा आणि अमरावती येथे एकाच वेळी मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेचा मुख्य उद्देश प्रवाशांना वैध तिकीट घेऊन प्रवास करण्यास प्रोत्साहित करणे तसेच अनधिकृत प्रवासावर प्रभावी नियंत्रण प्रस्थापित करणे हा होता. तपासणी मोहिमेत मुख्य वाणिज्य निरीक्षक, मुख्य तिकिट निरीक्षक, मुख्य बुकिंग पर्यवेक्षक तसेच वाणिज्य विभागातील



कर्मचार्यांसह एकूण ५७ कर्मचारी आणि रेल्वे सुरक्षा बलाचे आठ कर्मचारी सहभागी झाले. अस्वच्छता पसरवणायांवरही कारवाईया विशेष तपासणी मोहिमेदरम्यान एकूण ६८३ प्रकरणांवर कारवाई करण्यात आली तर चार लाख ७१ हजार २४५ रुपयांचा दंड वसूल करण्यात आला. याशिवाय, रेल्वे अधिनियमाच्या कलम १४५(ब) अंतर्गत सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरविण्याशी संबंधित २१ प्रकरणांमध्ये कारवाई करून तीन हजार ३०० रुपये दंड वसूल करण्यात आला. स्थानक परिसरात अनधिकृतपणे व्यवसाय करणार्या चार विक्रेत्यांविरुद्ध नियमानुसार कारवाई करण्यात आली. रेल्वे प्रवाशांनी वैध तिकिट घेऊन जबाबदारीने व नियमांचे पालन करून प्रवास करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# जिल्ह्यात पाणी टंचाईचे सावट?

## धरणांमध्ये केवळ ३३ टक्के साठा : पाणी बचततीचे आवाहन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटून गेला असला तरी मान्सूनने अद्याप अपेक्षित हजेरी लावलेली नाही. यामुळे बळीराजा आकाशाकडे डोळे लावून बसला आहे, तर दुसरीकडे जिल्ह्यातील प्रमुख धरणांतील पाणीसाठा झपाट्याने घटत असून सध्या जिल्ह्यातील मोठे, मध्यम व लघुप्रकल्पांमधील एकूण जलसाठा केवळ ३३ टक्क्यांवर आला आहे. पावसाने लवकरच जोरदार पुनरागमन न केल्यास जिल्ह्यावर भीषण पाणीटंचाईचे संकट ओढवण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

गेल्या वर्षी याच काळात जिल्ह्यातील धरणांमध्ये ५२ टक्के जलसाठा उपलब्ध होता. मात्र यंदा तो तब्बल १९ टयांनी घटून ३३ टक्क्यांवर आला आहे. त्यामुळे प्रशासनासह नागरिकांचीही चिंता वाढली आहे. जिल्ह्यातील अनेक भागांमध्ये उन्हाची तीव्रता कायम असून पावसाअभावी जलस्रोत आटण्याच्या मार्गावर आहेत. पाणीटंचाईची गंभीरता लक्षात घेऊन प्रशासनाने खबरदारीची पावले उचलण्यास सुरुवात केली आहे. गिरणा धरणातून होणारा शेतीसाठीचा पाणीपुरवठा बंद करण्यात आला असून जलसाठा पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. सिंचन विभागाने जिल्ह्यातील धरणांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा आढावा घेऊन दि. ३१ ऑगस्टपर्यंत पिण्याच्या पाण्यासाठी साठा राखून ठेवण्याच्या सूचना दिल्या आहेत.

हतनूर धरणात सध्या केवळ २१ टक्के जलसाठा शिल्लक आहे. गेल्या वर्षी याच दिवशी धरणात ५८ टक्के साठा उपलब्ध होता. तर गिरणा धरणात २९ टक्के जलसाठा असून मागील वर्षी हा साठा २१ टक्के होता. वाघूर धरणाची स्थिती तुलनेने समाधानकारक असून येथे ६२ टक्के जलसाठा उपलब्ध आहे. जिल्ह्यातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सध्या प्रामुख्याने हतनूर आणि गिरणा धरणांवर अवलंबून आहे. विशेषतः धुळे आणि जळगाव जिल्ह्यांसाठी जीवनदायिनी ठरणाऱ्या गिरणा नदीवरील पाणीपुरवठ्यावर याचा थेट परिणाम होऊ शकतो. आगामी काही दिवसांत समाधानकारक पाऊस न झाल्यास परिस्थिती आणखी गंभीर होईल. यामुळे आता संपूर्ण जळगावकरांसह बळीराजाच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहे.

# पपई पिकाच्या नुकसानीवरुन वाद; शेतकरी व मुलाला मारहाण

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**चोपडा** प्रतिनिधी

तालुक्यातील शिवारात पपई पिकाचे नुकसान झाल्याच्या कारणावरून झालेल्या वादातून ६० वर्षीय शेतकरी आणि त्यांच्या मुलाला लाकडी दांडक्याने व लाथाबुयांनी मारहाण करण्यात आल्याची घटना घडली. याप्रकरणी चोपडा शहर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध मारहाण, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चोपडा शिवारातील गट क्रमांक ३९४ व ३९५ मधील शेतात १७ जून रोजी दुपारी साडेदोन ते तीन वाजेच्या सुमारास हा प्रकार घडला. जोगीलाल शंकर पारधी (वय ६०, रा. रामपुरा, चोपडा) हे दिलीप विश्वाम चव्हाण यांच्या शेतात निमबटाईने शेती करतात. त्यांनी शेतात पपईचे पीक घेतले असून घटनेच्या दिवशी काही बकऱ्या शेतात शिरल्याने पिकाचे तसेच ठिबक सिंचनाच्या नळ्यांचे नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. नुकसान झाल्यानंतर संबंधित बकऱ्या पीक संरक्षण सोसायटीमध्ये नेण्याचा निर्णय घेतल्याने वाद निर्माण झाला. याचा राग आल्याने आरोपींनी फिर्यादी व त्यांच्या मुलाला अडवून मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

फिर्यादीनुसार, पवन सिताराम पारधी याने लाकडी दांडक्याने जोगीलाल पारधी यांच्या डोक्यावर व छातीवर वार केले. तर निलेश बापू भालेराव, विक्की अशोक पारधी आणि मयुर यादव सोनार यांनी लाथाबुयांनी मारहाण केली. तसेच अश्लील शिवीगाळ करत जीवे मारण्याची धमकी दिल्याचाही आरोप करण्यात आला आहे. या घटनेत दीपक जोगीलाल पारधी हे जखमी झाले असून त्यांच्यावर चोपडा येथील हरताळकर हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू आहेत. जोगीलाल पारधी यांच्या फिर्यादीवरून चोपडा शहर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस निरीक्षक पवन देसले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सचिन चौधरी करीत असून पोलिसांकडून पुढील चौकशी सुरू आहे. पिकाच्या नुकसानीवरून सुरू झालेल्या वादाने हिंसक वळण घेतल्याने परिसरात या घटनेची चर्चा सुरू आहे.

# पाण्यासाठी महिलांचा जळगावात हंडा मोर्चा

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

ग्रामीण मतदारसंघातील सावखेडा शिवार, कोल्हे हिल्स परिसर, वाघ नगर, माऊली नगर आणि परिसरातील नागरिकांना अनेक दिवसांपासून पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. या भागात तब्बल पंधरा दिवसांनी केवळ अर्धा तास पाणीपुरवठा होत असल्याचा आरोप करत संतप्त महिलांनी शुक्रवारी जिल्हाधिकारी कार्यालयावर हंडा मोर्चा काढला. वंचित बहुजन युवा आघाडीच्या नेतृत्वाखाली काव्यरत्नावली चौक ते जिल्हाधिकारी कार्यालयापर्यंत हा मोर्चा विविध घोषणांनी दणाणून गेला.

मोर्चामध्ये सहभागी झालेल्या महिलांनी रिकामे हंडे हातात घेत प्रशासन आणि लोकप्रतिनिधींविरोधात जोरदार घोषणाबाजी केली. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, पाणीपुरवठ्याबाबत यापूर्वीही अनेकदा निवेदने देण्यात आली, तसेच विविध प्रकारची आंदोलने करण्यात आली. मात्र प्रशासनाकडून कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आलेली नसल्याने नागरिकांचा संताप अधिकच वाढला आहे. महिलांना घरगुती कामांसह पिण्याच्या पाण्यासाठी मोठी कसरत करावी लागत असून, याचा दैनंदिन जीवनावर गंभीर परिणाम होत असल्याचे आंदोलकांनी सांगितले. जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर करत परिसरात नियमित आणि पुरेशा प्रमाणात पाणीपुरवठा करण्याची मागणी करण्यात आली. समस्या तातडीने न सुटल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही आंदोलकांनी दिला. या हंडा मोर्चामुळे शहरात काही काळ लक्षवेधी वातावरण निर्माण झाले असून, प्रशासन या प्रश्नावर काय भूमिका घेते याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# नीट परीक्षेदरम्यान 100 मीटर परिसरात प्रवेश बंदी

## २१ जून रोजी आयोजन : प्रशासनातर्फे नियोजन

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

जिल्ह्यातील परिक्षा केंद्रावर नीट (यूजी) परीक्षा दि. २१ जून २०२६ रोजी होणार असून परीक्षेदरम्यान कोणतेही गैरप्रकार होऊ नयेत यासाठी प्रशासनाने उपाययोजना लागू केल्या आहेत. जिल्ह्यातील सर्व परीक्षा केंद्रांवर कॉपीमुक्त अभियान राबविण्यात येणार आहे.

जिल्ह्यात नीट (यूजी) परीक्षेसाठी एकूण १२ परीक्षा केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. परीक्षा काळात केंद्रांवर गैरप्रकार होऊ नये तसेच शांतता व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेऊन अपर जिल्हादंडाधिकारी वैशाली चव्हाण यांनी भारतीय नागरी सुरक्षा संहिता २०२३ च्या कलम १६३ अन्वये आदेश जारी केला आहे. या आदेशानुसार, २१ जून रोजी परिक्षा केंद्रावर पेपर सुरू झाल्यापासून ते पेपर संपेपर्यंतच्या कालावधीत सर्व परीक्षा केंद्रांच्या १०० मीटर परिसरात कोणालाही प्रवेश करण्यास मनाई करण्यात आली आहे. मात्र, सदर आदेशान्वये परीक्षार्थी, नियुक्त अधिकारी-कर्मचारी, पोलीस व होमगार्ड यांना या निर्बंधातून सूट देण्यात आली आहे. परीक्षा केंद्रांच्या ५०० मीटरच्या परिसरातील झेरॉक्स दुकानेही वरील कालावधीत बंद ठेवण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. आदेश तातडीच्या परिस्थितीमुळे एकतर्फी जारी करण्यात आला असून त्याचे काटेकोर पालन करण्याचे आवाहन प्रशासनाने प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशोत्सव उत्साहात

## पहिल्याच दिवशी आनंददायी वातावरण : गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा विश्वास

**लोकशाही न्यूज नेटवर्क**
**जळगाव** प्रतिनिधी

उन्हाळी सुट्टीनंतर नव्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात होताच शहरालगतच्या सावखेडा येथील जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये प्रवेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. शाळेच्या प्रवेशद्वारापासून वर्गखोल्यांपर्यंत फुलांची सजावट, आंब्याच्या पानांचे तोरण, ढोल-ताशांचा गजर आणि शिक्षकांचे प्रेमळ स्वागत यामुळे संपूर्ण परिसर आनंदमय वातावरणाने फुलून गेला होता. शाळेत प्रथमच दाखल झालेल्या चिमुकल्यांच्या चेहऱ्यावर सुरुवातीला थोडीशी भीती आणि कुतूहल दिसत होते. मात्र शिक्षकांनी केलेले औक्षण, गुलाबपुष्प आणि चॉकलेट देऊन केलेले स्वागत पाहून विद्यार्थ्यांचा संकोच



दूर झाला आणि त्यांच्या चेहऱ्यावर आनंद खुलला. पालकांनीदेखील शाळेतील सकारात्मक वातावरण आणि विद्यार्थीकेंद्रित उपक्रमांचे कौतुक केले.

यावेळी स्कूलच्या मुख्याध्यापिका क्रिस्टाबेल परेरा यांनी विद्यार्थ्यांचे स्वागत करून नव्या शैक्षणिक वर्षासाठी शुभेच्छा दिल्या. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, स्कूल कमिटी सदस्य तसेच पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकापुरते शिक्षण न देता त्यांचा बौद्धिक, सामाजिक, सांस्कृतिक आणि शारीरिक विकास घडविण्याच्या उद्देशाने जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्ये विविध अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. आकर्षक स्मार्ट क्लासरूम, किड्स लायब्ररी, आर्ट स्टुडिओ, पपेट थिएटर, सेमी-ओलंपिक स्विमिंग पूल, आउटडोअर प्ले एरिया, मॉन्टेसरी टूल-बेस्ड लर्निंग, लाइफ स्किल आणि कल्चरल ट्रेनिंग, आर्ट इंटिग्रेटेड लर्निंग, स्पोर्ट्स अँड फिटनेस ट्रेनिंग, अशा सुविधा विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी कार्यरत आहेत. याशिवाय अनुभवी व प्रशिक्षित शिक्षकवर्ग, विद्यार्थीकेंद्रित अध्यापन पद्धती, प्रत्येक वर्गाचे सूक्ष्म नियोजन, नियमित शिक्षक प्रशिक्षण कार्यक्रम आणि सुरक्षित, सुसज्ज कॅम्पस यामुळे विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षणाचे वातावरण उपलब्ध होत आहे.

**सक्षम विद्यार्थी घडविण्याचा संकल्प**

यावेळी स्कूलच्या संचालिका पलक रायसोनी म्हणाल्या की, विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण, आधुनिक कौशल्ये आणि मूल्याधिष्ठित संस्कार देऊन त्यांना भविष्यातील आव्हानांसाठी सक्षम बनविणे हे आमचे ध्येय आहे. रायसोनी एज्युकेशनने शिक्षण क्षेत्रात निर्माण केलेला विश्वास आणि गुणवत्ता जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूलमध्येही कायम राखली जाईल. नव्या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीलाच विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर उमटलेला आनंद आणि पालकांनी व्यक्त केलेला विश्वास यामुळे जी. एच. रायसोनी पब्लिक स्कूल विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी एक आदर्श शैक्षणिक केंद्र म्हणून पुढे येत असल्याचे चित्र प्रवेशोत्सवाच्या निमित्ताने पाहायला मिळाले.